# घडा 1

# कायदा आणि तुमचे दैनंदिन जीवन

# प्रस्तावना

आपण कायद्याचा अभ्यास का करतो? बहुतेक लोक एकतर कायद्याचा अभ्यास व्यावसाय करण्यासाठी, वकील बनण्यासाठी करतात, तर काहीजण शिक्षक होण्यासाठी करतात. तर इतरांना कायद्याबद्दलच्या संशोधन प्रश्नांमध्ये किंवा कदाचित धोरणाचा आकार बदलण्यात किंवा राजकारणी म्हणून सरकारमध्ये भाग घेण्यामध्ये रूचि आहे. पण आपण वरीलपैकी काहीही करत नसतो तर काय ? किंवा वरीलपैकी काहीही कसे करावे हे माहित नाही? कायद्याबद्दल वाचण्यात, विचार करण्यात किंवा ऐकण्यात काही अर्थ आहे का? आणि जर आपल्याला वरीलपैकी काहीही लागू होत नसेल, तर कायद्याबद्दल विचार करण्यास सुरुवात करण्याची योग्य वेळ कधी?

रुबीच्या कथेचा विचार करा.

**रुबी ही एका समुदायातील १४ वर्षांची तरुण आणि उद्यमशील मुलगी आहे. तिच्या समुदायात, जी पारंपारिकपणे जंगलात राहणाऱ्या जमातीतील आहे, ती शाळेत औपचारिकपणे शिक्षण घेणारी पहिली व्यक्ती आहे. गावातील वडीलधारी मंडळी अनेकदा तिला महत्त्वाची दिसणारी कागदपत्रे वाचण्यासाठी आणि समजावून सांगण्यासाठी बोलावतात. अलीकडे, उच्च न्यायालयाने त्यांच्या राज्यातील काही वनक्षेत्रांना हत्ती कॉरिडॉर म्हणून चिन्हित केल्याबद्दल काही मार्गदर्शक तत्त्वे जारी केली, ज्याचा परिणाम व्यावसायिक होमस्टे आणि रिसॉर्ट्सच्या वाढत्या संख्येवर होतो. ह्या संदर्भात मार्गदर्शक तत्त्वे आणि त्यांच्या अधिकारांची व्याप्ती समजून घेण्यास समुदाय उत्सुक होता. तरुण मुले विशेषत: उत्साही होती कारण कदाचित याचा अर्थ असा होतो की त्यांच्याकडे मौल्यवान मोकळ्या जागा परत मिळू शकतील. रुबीला उच्च न्यायालयात प्रॅक्टिस करणाऱ्या तिच्या मैत्रिणीच्या काकांकडून निकालाची कॉपी मिळवता आली. तथापि, हा निकाल 60 पानांचा होता, ज्यामध्ये अशी क्लिष्ट भाषा होती की वास्तविक मार्गदर्शक तत्त्वे काय आहेत हे गोंधळात टाकणारे होते. रूबीला निराशा वाटली की ती ज्या भागात राहत होती त्याबद्दल न्यायालयांनी काय म्हटले आहे ते समजू शकली नाही आणि ती तिच्या समुदायाला मदत करू शकत नाही याबद्दल तिला हताश वाटले.**



**अशाप्रकारे कायद्याने अलिप्त वाटणारी रुबी एकटी नव्हे। आपल्यावर परिणाम करणाऱ्या गोष्टींचे तपशील आणि परिणाम समजून घेण्यास आपण सर्वांनी सक्षम असले पाहिजे. पुढच्या काही पानांमध्ये तुम्ही रुबीसारख्या इतरांना भेटाल. तुम्ही मनोजला भेटाल, जो संघर्ष करतो आणि नंतर न्यायालयांद्वारे आपल्या समुदायासाठी पीक विम्याच्या स्वरूपात राहत मिळवून देतो. तुम्हाला सलीम ह्या तरुण पारितोषिक विजेत्या छायाचित्रकाराची भेट होईल, जो निषेधाचे फोटो काढत आपले काम करत असताना अधिका-यांसोबत अडचणीत येतो. तुम्ही ध्रुविकाला देखील भेटाल, जिला आर्थिक फसवणुकीला बळी पडल्यामुळे फौजदारी न्याय प्रक्रियेत मार्गशोधन करावे लागते**



कायदा हा एकाच वेळी तत्त्वे आणि व्यवहार ह्याबद्दल आहे. ह्याचा अर्थ असा, की हे व्यावहारिक आहे - अगदी वास्तविक नियमांसह - आणि तसेच सैद्धांतिक देखील आहे, म्हणजे त्या नियमांमध्ये काही तर्क आहे. उदाहरणार्थ, कायद्याने परवानगीशिवाय एखाद्याच्या खाजगी मालमत्तेत प्रवेश करण्यास मनाई केली आहे आणि हे केल्याबद्दल अतिक्रमण केल्याच्या गुन्ह्यासाठी तुम्हाला शिक्षा होऊ शकते. ह्या निर्बंधामागील तत्त्व हे आहे की जेव्हा एखाद्याच्या मालमत्तेचे रक्षण करण्याचा अधिकार सुरू होतो तेव्हा तुमचे फिरण्याचे स्वातंत्र्य संपुष्टात येऊ शकते. कायद्याने ह्या दोन्ही गोष्टी एकत्र असल्या तरी अनेकदा त्या वेगळ्या होतात. आपल्या शाळांमध्ये आणि विद्यापीठांमध्ये आपण अनेकदा केवळ तत्त्वांचा अभ्यास करत असतो आणि आपल्या दैनंदिन जीवनात आपण तत्त्वांचा फारसा विचार न करता केवळ नियमांचे पालन किंवा आचरण करत असतो. रुबी, मनोज, ध्रुविका आणि सलीम ह्यांच्यासमोर व्यावहारिक समस्या येतात. कितीही प्रमाणात असली तरीही, त्यांना एकत्रित करण्यासाठी - कृती करण्यासाठी - त्यांना ह्या प्रत्येक व्यावहारिक समस्येमागील तत्त्वे समजून घेणे आवश्यक आहे.

तुमच्या समोर येणाऱ्या सर्व कथांमध्ये तुम्हाला दैनंदिन जीवनातून कायदेशीर प्रश्न निर्माण झालेले दिसतील, तुम्हाला त्यांचे हक्क बजावू पाहणारे तरुण सापडतील आणि ते तुम्हाला नागरी जागांच्या संदर्भात सापडतील. ह्या कार्यपुस्तिकेचा उद्देश तुम्हाला तुमच्या आजूबाजूच्या परिस्थितीवर फेरविचार करायला लावणे आणि ह्या तीन संदर्भातील कायद्याबद्दल विचार करणे हे आहे.

आता ह्या प्रत्येकाचा थोडा तपशीलवार विचार करूया.



# कायदा आणि दैनंदिन जीवन

जेव्हा तुम्ही शाळेच्या इमारतीत, सिनेमा किंवा बस किंवा मेट्रोमध्ये सुद्धा प्रवेश करता तेव्हा तुम्हाला नोटिस दिसतात ज्या तुम्हाला त्या भागात असण्याबाबत काय करावे आणि काय करू नये हे सांगतात. उदाहरणार्थ, जेव्हा तुम्ही शाळेच्या इमारतीत प्रवेश करता, तेव्हा तुम्हाला तुमचा मोबाईल फोन वापरण्याबद्दल किंवा धूम्रपान किंवा च्युइंगगमबद्दल पोस्टर दिसू शकते. हे असे नियम आहेत, ज्यांचा वापर आपण ज्या स्थानांशी संवाद साधतो त्या जागा नियंत्रित करण्यासाठी केला जातो आणि परिणामी, आपण कसे वागतो व स्वतःचे आचरण यावर प्रभाव टाकतो. आपल्या दैनंदिन जीवनात कोणत्या प्रकारचे नियम आढळतात? कायदा फक्त नियमांबद्दल आहे जे आपण पाळले पाहिजेत का आपण परिपूर्ण जीवन जगले पाहिजे अशा अधिकारांबद्दल देखील आहे?

जर ते नियमांपेक्षा जास्त असेल तर, शाळेच्या इमारतीच्या उदाहरणाकडे परत जाऊ या. काही सुरक्षितता प्रक्रिया, स्वच्छताविषयक मानके किंवा खेळ आणि परवडणारे शिक्षण यासंबंधीच्या सुविधांची खात्री देणाऱ्या शाळेचे हक्कही आमच्याकडे आहेत का?

हे असे प्रश्न आहेत जे आम्ही ह्या कार्यपुस्तिकेत शोधू इच्छितो. आपल्या दैनंदिन व्यवहारात कायदा कसा उदयास येतो हे आम्ही वघावे. ह्याचे कारण असे की, आम्हाला कायद्याची कल्पना अमूर्त, दूरचा विषय म्हणून नव्हे ज्यांची न्यायालये, संसदे आणि सरकारी कार्यालयांमध्येच आवश्यक असते, परंतु कायदा ही अशी गोष्ट आहे ज्याला आपण स्पर्श करू शकतो आणि अनुभवू शकतो. तुम्हाला काय वाटते? कायदा हा केवळ विचार करण्यासारखा विषय आहे, की आपल्यालाही जाणवणारी गोष्ट आहे? का त्याचा आपल्यावर ही परिणाम होऊ शकतो?

आपल्यापैकी बरेच जण इतरांपेक्षा कायदा अधिक ठळकपणे पाहू शकतात उदाहरणार्थ, जर आपल्या शेजारी पोलीस गस्त किंवा चेक पॉइंट किंवा कर्फ्यू असतील. आपण अशा दृश्यांच्या उपस्थितीच्या कारणांबद्दल विचार करू शकतो, आणि आपण आपल्या सभोवतालची उपस्थिती देखील अनुभवू शकतो. कायद्याची ही चिन्हे आपण आपले जीवन कसे जगतो हे लगेच ठरवतात. कायदा नेहमीच इतका स्पष्ट नसतो. उदाहरणार्थ, जर आपण शिक्षणाच्या अधिकाराबद्दल विचार केला, तर आपल्या शेजारी शाळा आहे का ह्याचा विचार करणे हे एक स्पष्ट संकेत आहे, परंतु अशा शाळा मुलांना भारतात मोफत आणि अनिवार्य शिक्षणाचा हक्क आहे ह्याची खात्री करतात का?

कायदा शोधत असताना तुम्ही कुठे पहाल ? उदाहरणार्थ, तुम्ही एखाद्या पुस्तकात किंवा आपल्या राज्यघटने मध्ये ते पहाल का? तुम्ही भेट दिलेल्या इतर ठिकाणी ते सापडेल का ?





पुढच्या वेळी तुम्ही बस पकडता किंवा मेट्रोने जाताना आजूबाजूला एक नजर टाका आणि कायदा काय रूप घेतो ते पहा. आपण एक उदाहरण घेऊ. मेट्रोमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे असण्यासाठी कायद्याची गरज आहे का ? आपण त्यांच्या हेतूबद्दल विचार करू शकतो का ? काही लोक असा वाद करू शकतात की असे कॅमेरे असणे हे मेट्रोवरील लोकांची सुरक्षितता आणि संरक्षा सुनिश्चित करण्यासाठी महत्वाचे आहेत. इतर लोक ह्याचा विरोध करताना म्हणू शकतात की, सरकार लोकांच्या गोपनीयतेचे उल्लंघन न करता आणि आमच्या सर्व हालचालींवर लक्ष न ठेवता हा अधिकार प्रदान करू शकते. तुम्ही घरातून, शाळेत, कामावर, चित्रपटगृहात, रुग्णालयात किंवा खेळायला जाताना कायद्याचे इतर पैलू कोठे पाहतात याचा विचार करावा अशी आमची इच्छा आहे.



हे कार्यपुस्तक हा विचार करण्याचे आमंत्रण आहे की कायदा फक्त पुस्तकात नाही, तर आपण राहतो त्या जागेत दिसणारी गोष्ट आहे. असे करताना, आम्ही इच्छीतो की आपण सूचना किंवा वस्तू ह्यासारख्या सामग्रीकडे लक्ष द्यावे, जसे की वाहतूक दिवे, किंवा ज्या ठिकाणी आपण सहल किंवा निषेध करू शकतो, हे विविध साहित्य, वस्तू आणि मोकळी जागा असे अर्थ का निर्माण करतात, ज्यामुळे आपण कसे वागले पाहिजे किंवा एखाद्या विशिष्ट जागेत आपण कशाप्रकारे मागण्या केल्या पाहिजेत ह्याचा विचार करावा.



# तरुण लोक आणि कायदा

खालील परिस्थितीचा विचार करा.

तुम्हाला शहराच्या मध्यावर्ती भागापासून मुख्य रेल्वे स्थानकापर्यंत जायचे आहे. तुम्ही सध्या कुठे आहात आणि तुम्हाला शेवटी कुठे जायचे आहे, हे तुम्हाला माहीत आहे पण तिथे कसे जायचे हे तुम्हाला माहीत नाही. सर्वात उपयुक्त मदत काय असेल?

❀ प्रवासाच्या सुरुवातीला कोणीतरी तुम्हाला दिशा समजावून सांगते

❀ तुम्ही प्रवास करत असताना वाटेत असलेल्या लोकांना विचारता

❀ मार्ग स्पष्टपणे चिन्हांकित केलेला आपला स्वतःचा नकाशा असतो

पहिले दोन उपयोगाचे असले तरी ते विश्वसनीय नसु शकतात. तुम्हाला दिलेले दिशानिर्देश तुम्ही विसरु शकता किंवा त्या व्यक्तीला तुम्हाला सर्वोत्तम दिशा देण्यासाठी पुरेशी माहिती नसु शकते किंवा तुम्हाला काही अडथळे येऊ शकतात आणि त्याभोवती कसे जायचे हे तुम्हाला माहीत नसते. तुम्ही वाटेत लोकांवर अवलंबून राहिल्यास तुम्हाला जास्त वेळ लागू शकतो कारण लोकांनाही दिशा माहीत नसु शकते. नकाशा असणे तुम्हाला स्वतःसाठी सर्वोत्तम मार्ग निवडण्यात मदत करेल. मार्गात अडथळा असला किंवा तुम्ही कुठे आहात हे लोक तुम्हाला सांगू शकत नसले तरीही तुमच्या मदतीसाठी तुमच्याकडे नकाशा असेल.

कायद्याचे ज्ञान आणि त्याबद्दल तुम्हाला कुठे अधिक माहिती मिळेल हे जाणून घेणे हे तुमच्यासाठी सर्वात शक्तिशाली साधन आहे. तुमच्या हक्कांची आणि तुमच्या कर्तव्यांची जाणीव असणे म्हणजे तुमच्यासाठी अन्यायापासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी नकाशा असण्यासारखे आहे. इतर तज्ञ जसे की वकील मदत करू शकतात परंतु जोपर्यंत समस्या काय आहे आणि तुम्हाला कुठे मदत घ्यावी हे तुम्हाला स्पष्टपणे माहीत नसेल तोपर्यंत तुम्ही न्यायाच्या त्या प्रवासात हरवून जाऊ शकता.

कल्पना करा की समानतेचा अधिकार हा भारतीय राज्यघटनेने आपल्याला दिलेला मूलभूत अधिकार आहे, हे तुम्हाला माहीतच. तर काय होऊ शकते? तुम्हाला कदाचित माहित नसेल की एखादा नियोक्ता तुमच्याशी जात, धर्म, लिंग इत्यादींच्या आधारावर भेदभाव करू शकत नाही. जर कोणी तुमच्याशी भेदभाव करत असेल तर तुम्ही न्यायालयात जाऊ शकता हे तुम्हाला माहीत नसेल. समजा तुम्हाला माहित नसेल की १८ वर्षांवरील प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा अधिकार आहे. तुम्ही निवडणुकीत भाग घेऊ शकता हे तुम्हाला माहीत नसेल आणि त्यामुळे सरकारबद्दल तुमचे विचार व्यक्त करण्यासाठी सर्वात महत्त्वाची भूमिका - तुमचे मत तुम्ही वापरणार नाही. तुमचे अधिकार काय आहेत आणि तुम्ही त्यांचे संरक्षण कसे करू शकता हे माहीत नसल्यामुळे तुमच्याशी अन्यायकारक वागणूक होऊ शकते.





कायदा हा प्रौढांसाठी आहे अशी एक धारणा आहे. पण कायदा केवळ प्रौढ लोकांवर परिणाम करतो का? तरुणांचा कायद्याशी संबंध कसा असू शकतो? आपली परिस्थिती कशीही असो, वय काहीही असो, कायदा आपल्या सर्वांसाठी उपयुक्त आहे. उदाहरणार्थ, समानतेचा अधिकार हा आपल्या सर्वांना आहे, जर तुम्हाला तुमच्या धर्मामुळे एखाद्या विशिष्ट शाळेत जाण्याची परवानगी कोणी देत नसेल तर तुम्ही चौदा वर्षांचे असून ही त्या शाळेला न्यायालयात नेऊ शकता. तुम्हाला तुमची पहिली नोकरी मिळाल्यावर, तुम्ही एक महिला असाल आणि तुम्हाला कोणत्याही प्रकारच्या लैंगिक छळाचा सामना करावा लागला असेल, तर तुम्ही तुमच्या संस्थेच्या अंतर्गत तक्रार समितीकडे अपील करू शकता. अशी समिति प्रत्येक संस्थे कडे असने कायद्यानुसार आवश्यक आहे. तुम्ही तुमच्या हक्कांची मागणी करण्यापूर्वी तुम्ही प्रौढ होण्यापर्यंत किंवा तुम्ही जीवनात एक विशिष्ट स्थिती गाठेपर्यंत थांबण्याची गरज नाही. कारण तुम्ही जन्माने भारतीय नागरिक आहात आणि आपल्या राज्यघटनेनुसार तुम्हाला हे अधिकार मिळाले आहेत.

कायदा इतर मार्गाने देखील कार्य करतो – तो तुम्हाला लागू होण्याआधी विशिष्ट वयापर्यंत थांबत नाही. कायद्याचे पालन न केल्यास शिक्षा होऊ शकते. जर एखाद्या पोलिसाने तुम्हाला गाड़ी वेगात चालवताना पकडले आणि तुम्ही असा दावा केला की तुम्हाला वेगमर्यादा माहित नाही आणि तुम्ही नुकतेच गाडी चालवायला शिकायला सुरुवात केली असेल. तरी पण पोलिस तुम्हाला दंड करू शकतात. जर तुम्ही अल्पवयीन असाल, म्हणजे तुमचे वय 18 वर्षांपेक्षा कमी असेल तर ते विचारात घेतले जाईल, तरीही अविचारीपणे गाडी चालवल्यामुळे होणाऱ्या कोणत्याही हानीसाठी तुम्हालाच जबाबदार धरले जाईल. आपण कोणीही असलो तरीही, आपण सर्वांनी कायद्याचे पालन करणे आवश्यक आहे.

कायदा मृत वस्तू देखील नाही. उदाहरणार्थ, शिक्षणाचा अधिकार कायदा २००४ साली मंजूर झाला. जेव्हा विधेयक संसदेत पास होते तेव्हा ते कायदा बनण्याच्या प्रक्रियेचा तुम्ही थेट भाग नसाल, परंतु विधेयकासंबंधीच्या सार्वजनिक चर्चांमध्ये भाग घेण्यासाठी तुमचे वय १८ वर्षांपेक्षा जास्त असणे आवश्यक नाही. अशा चर्चेला प्री-लेजिस्लेटिव्ह सार्वजनिक सल्लामसलत म्हणून संबोधले जाते. तुम्ही तुमच्या मित्रां बरोबर अधिक न्याय्य आणि अधिक लोकांच्या गरजा प्रतिबिंबित करणाऱ्या कायद्यांसाठी मोहीम करू शकता. एकदा तुमचे मतदान करण्याचे वय झाले की संसदेत तुमचा आवाज कोणाला द्यायचा हे ठरवण्यात तुम्ही भूमिका बजावू शकता. तुमचे अधिकार आणि कर्तव्ये काय आहेत, हे तुम्हाला माहीत असले तर तुम्ही बदल आणु शकता.





# आमच्या नागरी जागा

तर आता आपण आपल्या दैनंदिन जीवनात कायद्याचा विचार करत आहोत. पण रोजचे जीवन म्हणजे काय? आम्ही सबंध दिवसातून वेगवेगळ्या परिस्थितीतून जातो. आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीशी संबंधित स्वतःबद्दल विचार करा. तुम्ही सर्व ठिकानी एकसमान व्यक्ती आहात का? तुम्ही घरात, शाळेत, क्रीडा मैदानावर, तुमच्या कामाच्या ठिकाणी किंवा तुमच्या स्थानिक प्रशासकीय कार्यालयात समान व्यक्ती आहात का? ज्याप्रमाणे आपण वेगवेगळ्या ठिकाणात वेगवेगळ्या भूमिका घेतो, त्याप्रमाणे कायदा देखील तसेच करतो. कायदा समजून घेण्याचा एक उपयुक्त मार्ग म्हणजे तो भूमिकांच्या संदर्भात समजून घेणे.

काही ओळखण्यायोग्य जागा तुमचे घर, तुमची शाळा किंवा तुमचे कामाचे ठिकाण असू शकतात. ह्या कार्यपुस्तकात तुमचे सार्वजनिक जीवन आणि नागरी जागांमध्ये सार्वजनिक सहभागाला आकार देणाऱ्या कायद्यांबद्दल विचार मांडले आहे।

नागरी जागा म्हणजे काय?

नागरी जागांचा समुदायाचा विस्तार म्हणून विचार करा. एक भौतिक जागा, जिथे एखादी व्यक्ती स्वतःला व्यक्त करू शकते आणि समुदायाचे सक्रिय सदस्य होऊ शकते. नागरी जागा संघटित करण्यासाठी, व्यक्त करण्यासाठी, निषेध करण्यासाठी आणि बदल घडवून आणण्यासाठी वापरल्या जाऊ शकतात. चला आपल्या भोवतीची चौकशी करू या आणि या भौतिक जागा नागरी जागा म्हणून कशा समजल्या जाऊ शकतात ते पाहू या.

नागरी जागा कृतीबद्दल आहेत. हे एक कायदेशीर, राजकीय आणि सामाजिक क्षेत्र आहे, जे आम्हाला आवाहन करते:

- माहिती घ्या
- सावध रहा
- सहभागी व्हा

तुमच्या भोवतीची ही तीन सामान्य क्षेत्रे ओळखा - त्यांच्या दैनंदिन उद्देशाचा विचार करा आणि मग ते नागरी जागा म्हणून कसे बदलले जातील याचा विचार करा.










पण ते तितके सोपे नाही. नागरी जागा देखील संरक्षित करणे आवश्यक आहे. ही अशी ठिकाणे आहेत, जिथे सर्व नागरिक, त्यांची पार्श्वभूमी, वय, जात, धर्म, रंग यांचा विचार न करता त्यांचे हक्क बजावण्यासाठी बाहेर पडू शकतात. ह्याचा अर्थ, ह्या जागा सुरक्षित असणे आवश्यक आहे. हे कार्यपुस्तक प्रमुख कायदेशीर प्रश्नांकडे पाहते, जे तुम्हाला नागरी जागा, त्यामधील तुमची भूमिका आणि त्या भूमिकेची कृती कशी करावी हे समजून घेण्यास मदत करेल.

# ह्या कार्यपुस्तकाचा वापर

पुढील काही धड्यांमध्ये, तुमची नागरी जागा सुलभ करणाऱ्या महत्त्वाच्या कायदेशीर संरचना समजून घेण्यासाठी तुम्ही प्रवास कराल. तुम्ही खालचे विषय जवळून पहाल:



राज्यघटना:
त्याची मूलभूत तत्त्वे काय आहेत? ही तत्त्वे आपल्या कायद्यांचा आधार कसा बनतात?



न्यायालये
आमच्या न्यायालयांची रचना कशी आहे? त्यात आपण कसे पोहोचू शक्तो



फौजदारी न्याय प्रणाली
जेव्हा आपली भूमिका कायद्याच्या विरोधामध्ये असते तेव्हा काय होते? जेव्हा आपण एखाद्या गुन्ह्याला बळी पडतो तेव्हा आपण प्रणाली ह्यातून मार्ग कसा कोढतो ?



निवडणूक प्रणाली
सरकारात आपला औपचारिक सहभाग कसा दिसतो? कोणती तत्त्वे आणि प्रणाली हे सुलभ करू शकतात?

तथापि, आपण मूल नियम लक्षात ठेवला पाहिजे. आम्ही सिद्धांत आणि सराव ह्याना एकमेकांजवळ आणण्याचा प्रयत्न करत आहोत. त्यामुळे प्रत्येक तत्त्व क्रियाकलापांसह असेल आणि प्रत्येक टप्प्यावर, तुम्हाला तुमच्या संदर्भाबद्दल विचार करण्यास प्रोत्साहित केले जाईल.

जेव्हा तुम्हाला ? चिन्ह दिसते, तेव्हा आजूबाजूला पाहण्यासाठी सज्ज व्हा - तुम्हाला तुमच्या आसपासच्या परिस्थितीचा किंवा तुम्ही काय वाचत आहात ह्याचा विचार करणे आवश्यक आहे.

जेव्हा तुम्हाला चिन्ह दिसेल, तेव्हा थांबा. हा मुद्दा थांबून विशेष नोंद घ्येन्या जोगा आहे. ही एक उत्तम खूण किंवा समझून लक्षात ठेवण्यासारखी आहे.

प्रत्येक धड्याच्या शब्दकोषाचा आधार घ्या, पुढील माहिती गोळा करा आणि ह्या कार्यपुस्तिकेच्या पलीकडे प्रवास करा.

शेवटी, हे कार्यपुस्तक तुमच्यासाठी सुविधेचे माध्यम आहे. आम्ही बऱ्याचदा दुर्गम समस्यांसारख्या वाटणाऱ्या समस्यांचे निराकरण करीत आहोत आणि त्यांचे व्यवस्थापन करण्यायोग्य लहान भागांमध्ये मोडून करीत आहोत. आपल्या सभोवतालच्या परिस्थितीकडे पुनर्विचार करणे, एजन्सी पुनर्संचयित करणे आणि पुन्हा आशा जागृत करणे हे ध्येय आहे.

**तर एकदा आपण कार्यपुस्तिका पाहिल्यानंतर काय वेगळे होण्याची आपण अपेक्षा करू शकतो?**

ह्या कार्यपुस्तिकेच्या शेवटी, तुम्ही याबतीत सक्षम असाल:

- तुमच्या दैनंदिन जीवनात आणि आसपासच्या परिसरात कायद्याची उपस्थिती ओळखने.
- दूरच्या मुद्द्या ऐवजी तुमच्या विशिष्ट संदर्भात कायद्याचा विचार करणे.
- संस्था, अभिनेते आणि कार्यपद्धती ह्यामागील तत्त्वे आणि तर्क समजून घेणे.
- तुमच्या नागरी जागा स्पष्ट आणि कृती करण्यायोग्य जागा म्हणून पहाणे.
कायद्याबद्दल सरळ आणि सहज बोलणे!

# घडा २

# संविधान आणि तुम्ही




# परिचय

कोणत्याही दिवसाचे, महिन्याते, वर्षाचे - कोणतेही वर्तमानपत्र पहा. लोकांच्या हक्कांसाठी आंदोलन करणाऱ्या त्यांच्या बातम्यांवर वर्तुळ करा - मग ते शेती, सिनेमा, खेळाडूंचे संरक्षण, वाढलेल्या किमती, परवाने रद्द करणे, शालेय गणवेश किंवा आरक्षणावर चर्चा असे हे विविध विषय असोत. सरकारच्या कोणत्याही कारवाईच्या अहवालास वर्तुळ करा - राज्य किंवा राष्ट्रीय निवडणुका, फौजदारी खटला, कोणत्याही न्यायालयाचा किंवा तपास संस्थेचा निर्णय, रस्ते किंवा पूल बांधणे, राजकीय पक्ष बदलणे, पोलिसांचे छापे, कोणत्याही नवीन विकास योजनेचा परिचय असो. शेवटी भारताच्या इतिहासावरील कोणत्याही कथेवर वर्तुळाकार करा - स्मारकांचे पुनरुत्थान, रस्त्यांची नावे बदलणे, इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांची सामग्री, भूतकाळातील नेते आणि दिग्गजांचे स्मरण आणि सण साजरे करणे.

तुम्ही वाचलेल्या बातम्यांच्या प्रत्येक विषय आणि तुमच्या मनात निर्माण झालेला कोणताही प्रश्न, सर्व एकत दस्तऐवजाशी संबंधित आहेत - भारताची संविधान, 1950.

भारताची संविधान असो किंवा कोणत्याही देशाची संविधान असो, हे असे दस्तऐवज आहे जे देशातील सर्व कृती नियंत्रित करते. ह्याची तीन प्राथमिक कार्ये आहेत :

❀ हे आमच्या मालकीच्या अधिकारांणा मान्यता देते आणि त्यांचा आदर आणि संरक्षण करण्यासाठी सरकारसाठी नियम तयार करते;

❀ विधीमंडळ, कार्यकारी आणि न्यायपालिका, त्यांच्यातील संबंध आणि त्यांची कर्तव्ये परिभाषित करते;

❀ आणि शेवटी, ते ह्या देशाच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय इतिहासाला आदारंजली अर्पण करते.

# संविधान म्हणजे काय?

संविधान ही शासनाची मूलभूत सनद आहे. ह्याचा अर्थ काय? जेव्हा लोक एकत्र राहण्याचा निर्णय घेतात, तेव्हा त्यांनी एकत्र कसे राहावे ह्याचे नियम आवश्यक असतात. ह्याचा अर्थ असा आहे की त्या नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी ठराविक कोणीतरी असावे आणि त्यांचे पालन केले जाईल ह्याची खात्री असावी.

ह्याव्यतिरिक्त, हे देखील आवश्यक आहे की प्रभारी लोक स्वतः नियम मोडू शकत नाहीत. इथेच संविधानेची भूमिका येते. संविधान समाज आणि देशासाठी सर्व नियम ठरवते ह्यामुळे देश सुसंवादाने चालू शकते, हे ते नियम आहेत, लोक आणि त्यांचे "शासक" दोघांनीही पाळले पाहिजेत. म्हणजे, हा देशाचा सर्वोच्च कायदा आहे.

संविधान एक उच्च आणि शक्तिशाली दस्तऐवज वाटू शकते, जे आपण क्वचितच पाहतो किंवा ज्याविषयी ऐकतो. ह्याचा आपल्याशी काही संबंध नाही असे देखील वाटू शकते - शेवटी, हे एका लहान गटाने 75 वर्षांपूर्वी लिहिले होते. परंतु खालील तीन परिस्थितींची कल्पना करा –

समजा तुमच्याकडे सरकारी नोकरी आहे, जी तुम्हाला तुमच्या क्षमतेच्या आधारे मिळाली आहे. एक दिवशी, तुम्हाला त्या नोकरीतून काढून टाकले जाते - तुम्हाला कारणही न कळवता. तुम्हाला का काढण्यात आले हे जाणून घेण्याचा तुम्हाला अधिकार आहे का?

समजा तुम्ही शाळेत परीक्षा लिहित आहात. तुमचा □मित्र□ तुमच्याकडे एक कागदाचा एक तुकडा टाकतो, ज्यामध्ये तुम्हाला काहीही रूचि नाही. शिक्षकाला मात्र तुमच्या पायाजवळचा तो तुकडा लक्षात येतो आणि तुम्ही फसवणूक करत आहात असे समजूण, तुमचे न ऐकता, तुमची परीक्षा रद्द केली जाते.
जे झाले ते वाजवी आहे का?

समजा तुम्ही नवीन कायद्याच्या विरोधात शांततापूर्ण आंदोलनाला जातात. काही वेळातच पोलिस येतात आणि जमावाला लाठीचार्ज करतात आणि सुरक्षेच्या हितासाठी जमावाला पांगवतात.
पोलिसांची कारवाई योग्य होती का?

स्वाभाविकपणे तुमच्या लक्षात येईल की, तुमची उत्तरे अशी असू शकतात:

- होय, मी काही चूक केली आहे का हे मला माहित असणे आवश्यक आहे. माझी चूक नसल्यास, मी माझ्या उत्पन्नाचा स्रोत गमावू नये.
- नाही, ते न्याय्य नाही. शिक्षिकेने माझे ऐकले पाहिजे होते आणि मी तिला सांगायला हवे होते की मी फसवणूक केली नाही.
- नाही, पोलिस न्याय्य नव्हते. लोकांना जे कायदे अन्यायकारक वाटता, त्याविरुद्ध आंदोलन करण्याचा त्यांना अधिकार असला पाहिजे आणि पोलिस त्यांच्याशी हिंसक वागू शकत नाहीत.

तुमचे प्रत्येक उत्तर भारतीय संविधानेतील एका तरतुदीशी किंवा "अनुच्छेदाशी" संबंधित आहे. पहिली आणि दुसरी उत्तरे अनुच्छेद 14 वर आधारित आहेत, जो समानतेचा अधिकार आहे आणि अनुच्छेद 21, जो जीवनाचा अधिकार आहे.

तिसरे उत्तर अनुच्छेद 19(1)(a) शी संबंधित आहे, जे भाषण आणि अभिव्यक्तीची स्वातंत्र्यता आहे.

ह्यावरून असे दिसून येते की संविधान आपल्या सर्वांच्या आणि आपल्या दैनंदिन जीवनाच्या अगदी जवळ आहे.




# भारतीय संविधानाची सार्वत्रिक रचना:

भारतीय संविधानात 25 भाग, 448 अनुच्छेद आणि 12 अनुसूच्या आहेत, ज्यामुळे हे जगातील सर्वात मोठी संविधान आहे.

जगातील सर्वात प्रदीर्घ संविधानाचा अभ्यास करणे कोणालाही भीतीदायक वाटेल, त्यामुळे कोठून सुरुवात करावी? इतर कोणत्याही पुस्तकाप्रमाणे प्रारंभ करा - अनुक्रमणिकाचे पासून. तुमच्या रूचीवर अवलंबून सावकाशपणे अनुक्रमणिकेचा अभ्यास करा, काही भाग तुम्हाला आकर्षित करतील.

अनुक्रमणिका वाचत असताना, एक मजेदार गोष्ट आढडेल तुम्हाला दिसेल - अनुच्छेद 395, शेवटचा अनुच्छेद आहे, 448 नाही. असे का? ह्याचे उत्तर अनुक्रमणिकेतच आहे.

# उद्देशिका:

संविधानाच्या उद्देशिकेचा 'दूरदर्शी विधान', 'ब्लूप्रिंट' किंवा 'मूड बोर्ड' म्हणून विचार केला जाऊ शकतो. हे संविधान अंतिमत: त्याचा विशिष्ट तरतुदींमध्ये कोणती आवश्यक मूलभूत नैतिक तत्वे मूल्ये स्वीकारेल ते दर्शविते. भारतासाठी, उद्देशिका 1946 मध्ये वस्तुनिष्ठ ठराव म्हणून सुरू झाली, जी पंडित नेहरूंनी मांडली होती.

फक्त उद्देशिका वाचा - आपल्यापैकी कोणीही त्यात वापरलेल्या कोणत्याही शब्दाला अपवाद घेऊ शकतो का? आपण आज त्यापैकी कोणत्याही बदलण्यासाठी केस तयार करू शकतो को? त्यापैकी काही अटी आज लागू होन्या जोगी नाहीत असे तुम्हाला वाटते का? ह्याच तुम्ही काय जोडावे असे तुम्हाला वाटते?

ह्या विषयी ही विचार करा - 1978 मध्ये, उद्देशिकेमध्ये सुधारणा करूण त्यात □समाजवादी□ आणि □धर्मनिरपेक्ष□ हे शब्द समाविष्ट केले गेले.

# संविधान सभा वादविवादः

कल्पना करा की तुम्ही तुमच्या क्लास मॉनिटरसह तुमच्या वर्गासाठी काही नियम बनवणार आहात. हे नियम संपूर्ण शैक्षणिक वर्षासाठी तुमच्यावर परिणाम करतील - मुदतीबद्दलचे नियम, उशीरा असाइनमेंटसाठी दंड, तुम्ही किती दिवस गैरहजर राहू शकता इत्यादी. समझा तुमच्या वर्गात 100 लोक आहेत. तुमचा मॉनिटर काही नियम तयार करतो आणि मतदानासाठी ठेवतो. तुमच्या वर्गाचा मतदानानंतर तीन नियम खालीलप्रमाणे मंजूर होतात:

| नियम | नियमाचा पक्षेत | नियमाविरुद्ध |
|---|---|---|
| वर्गातील चर्चेत, प्रत्येक विद्यार्थी दोनपेक्षा जास्त वेळा बोलू शकत नाही | 90 | 10 |
| तुमच्या वर्गाचे नाव वंडरलँड आहे. | 70 | 30 |
| वर्गाची कोणतीही अधिकृत भाषा नाही. विद्यार्थी त्यांना सोयीस्कर असलेल्या कोणत्याही भाषेत एकमेकांशी संवाद साधू शकतात. | 55 | 45 |

आता खालील प्रश्नाचे उत्तर द्या:

ह्यापैकी कोणता नियम शैक्षणिक वर्षात सर्वात जास्त काळ टिकण्याची शक्यता आहे आणि कोणता नियम पास झाला तरी बदलण्याची शक्यता आहे असे तुम्हाला वाटते?

भारताच्या संविधानसभेने अशीच नियम बनवण्याची केली होती ज्याला भारताच्या संविधानाचा मसुदा तयार करण्याचे काम देण्यात आले होते. संविधान सभेचा वादविवाद 9 डिसेंबर 1946 रोजी सुरू झाला आणि 24 जानेवारी 1950 पर्यंत चालला. तीन वर्षांहून अधिक काळ संविधान लेखकांनी शक्य तितक्या सहमती मिळवण्याचा प्रयत्न करत संविधानाच्या प्रत्येक अनुच्छेदाच्या अनेक मसुद्यांवर चर्चा केली, वादविवाद केले, लिहिले आणि पुनर्लेखन केले व च्यानंतर एखाद्या विशिष्ट तरतुदीचा मजकूर पक्का केला.

संविधान तयार करण्याच्या प्रक्रियेत सर्वसहमती निर्माण आणणे हा एक अत्यंत महत्त्वाचा भाग होता. साध्या बहुमताच्या आधारावर निर्णय घेऊ नये हा प्रति संविधान लेखक सावध होते. ह्यामागे एक महत्वाचे कारण आहे.

संविधान सभेतील वाद-विवाद कुठल्याही भाषेत वाचा, उदाहरणार्थ अनुच्छेद 1.

संभाषण आणि लेखाच्या मसुद्यावर चर्चा करण्याच्या प्रक्रियेबद्दल तुम्हाला काय वाटते? ह्यातून राजकीय संवाद आणि निर्णय घेणे बाबत आपण काय शिकतो?

# भारतीय संविधानाच्या मूलभूत संकल्पना

मूलत: दोन संकल्पनांच्या आधारवर आपण भारतीय संविधान समझू शकतो. ही तत्त्वे भारतासाठी अद्वितीय नाहीत, जवळजवळ प्रत्येक आधुनिक संविधानाची वैशिष्ट्ये आहेत. ही म्हणजे :

- संविधानवाद
- अधिकारांचे पृथक्करण
  - क्षैतिज
  - अनुलंब (संघराज्य)

सोप्या भाषेत सांगायचे तर **संविधानवाद म्हणजे सत्तेवर मर्यादा ठेवण्याची कल्पना.** ही आवश्यकता कोणताही अधिकार अमर्यादित असू शकत नाही ह्यावर आधारित आहे. जर सत्ता अमर्यादित असेल तर ती त्या सत्तेखाली असलेल्या लोकांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालते. जेव्हा शासनाच्या मूलभूत दस्तऐवजात, म्हणजे, संविधानात, सत्तेत असलेल्या लोकांना प्रदान केलेल्या अधिकारांवर मर्यादा असतात, तेव्हा त्या संविधानात संविधानवाद आहे असे म्हटले जाते.

**अधिकारांचे पृथक्करण हा अधिकार मर्यादित करण्याचा एक मार्ग आहे.** शासन ही अनेक पैलू असलेली एक जटिल क्रिया आहे. ह्यामध्ये सामाजिक समस्यांची जाणीव, ह्या समस्यांना कसे सामोरे जावे, आणि नंतर उद्भवलेल्या कोणत्याही विवादाचे निराकरण समाविष्ट आहेत. जर ही सर्व कार्ये आणि तत्सम अधिकार एका व्यक्तीला दिले गेले तर (अ) अधिकार अमर्यादित असतात आणि (ब) एका व्यक्तीला ही सर्व कार्ये प्रभावीपणे पूर्ण करणे अशक्य आहे.

त्यामुळे, भारतासह बहुतेक संविधानांत तीन संस्थांची व्यवस्था आहेत.- कार्यकारी (धोरणं अंमलात आणते), विधिमंडळ (कायदे तयार करते) आणि न्यायपालिका (विवाद सोडवते). असे केल्याने, शासनाचे अधिकार राज्यातील तीन शाखांमध्ये वितरीत केले जातात. अशा वितरणामुळे अधिकारांचे केंद्रीकरण टळते. भारतीय संदर्भात अधिकारांचे पृथक्करण ह्यात चेक आणि बॅलन्स नावाची संकल्पना देखील समाविष्ट आहे, ज्याचा अर्थ असा की, कोणतीही शाखा दुसऱ्या शाखेची कार्ये करु शकत नाही (न्यायपालिका कायदे बनवू शकत नाही किंवा संसद सामान्यतः विवादांचा निवाडा करू शकत नाही), प्रत्येक शाखा एकमेकांवर नियंत्रण ठेवू शकते आणि ते ठेवावे पाहिजे. (उदाहरणे)



**संघराज्य व्यवस्था म्हणजे सत्ता वितरणाचात दुसरा मार्ग .** सामाजिक-राजकीय आणि आर्थिक दृष्ट्या वैविध्य असलेल्या भारतासारख्या देशात सत्तेचे केवळ एका थरात केंद्रीकरण करणे उचित नाही. **त्यामुळे राज्य आणि संघ राज्य सरकारांमध्ये दोन स्तरांवर अधिकारांचे वितरण केले जाते.** म्हणून, आपल्याकडे संघराज्य आहे, ज्यामध्ये एक संसद, एक कार्यकारिणी आणि भारताचे सर्वोच्च न्यायालय आहे, तसेच आपल्याकडे महाराष्ट्र, केरळ, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल ह्यासारखी राज्य आहेत, ज्यांपैकी प्रत्येकात राज्य विधानमंडळ, राज्य सरकार आणि उच्च न्यायालय आहेत. अशा प्रकारे, देशाच्या विविध भागांतील लोकांचे प्रतिनिधित्व केवळ राज्य स्तरावरच नाही, तर संघराज्य स्तरावरही केले जाते.




हे भारतीय संविधानात कसे प्रतिबिंबित झाले आहे?

विविध विषयांवर कायदे बनवणे आवश्यक आहे. तथापि, अनुच्छेद 246 नुसार हे विषय संसद आणि राज्य विधानमंडळांमध्ये विभागलेले आहेत. तुम्ही ही तरतूद वाचली तर ती तुम्हाला सातव्या अनुसूचीकडे वढावे लागेल, ज्यामध्ये तीन 'याद्या' आहेत. यादी I ही संघराज्य यादी आहे - ह्याचे विषय सर्व संसदेच्या अंतर्गत आहेत. यादी II ही राज्य यादी आहे - ह्याचे विषय राज्य विधानमंडळाच्या अंतर्गत आहेत. आणि शेवटी, यादी III – जी संसद आणि राज्यांमध्ये सामायिक केली जाते।

# मूलभूत अधिकार

आपल्याला संविधानाची व्यापक रचना आणि ती नियंत्रित करणारी तत्त्वे समजली आहेत, आता आपण संविधानाच्या सर्वात महत्त्वाच्या आणि जटिल भागाकडे जाऊया - भाग III.

ह्या चरणांचा विचार करा:

भाग 3 मध्ये किती अनुच्छेद आहेत ते बघा. तुम्ही अनुक्रमणिके पासून सुरू करून वाटल्यास अनुच्छेद (12-35) बघता भाग 3 पर्यंत पोहोचावे.

ह्या भागातील सर्व अनुच्छेदांची 'शीर्षके' वाचा. प्रत्येक तरतुदीचे 'विषय' म्हणून यांचा विचार करा. कायद्याचा भाषेत, शीर्षकाला 'मार्जिनल नोट' म्हणतात.

प्रथम वाचन: प्रत्येक अनुच्छेदचा मजकूर वाचा, परंतु अनुच्छेद 32 वर थांबा. लांब वाक्ये आणि क्लिष्ट भाषेबद्दल काळजी करू नका. प्रत्येक अनुच्छेदात काय आहे ह्याचा सारांश समजून घेण्याचा प्रयत्न करा.

दुसरे वाचन: प्रत्येक अनुच्छेदचा मजकूर ह्या वेळी अतिशय हळूवारपणे वाचा आणि अपरिचित आणि / किंवा महत्वाचे वाटणारे शब्द चिन्हांकित करा.

आता ह्या प्रश्नांची उत्तरे द्या:

तुम्हाला असे वाटते की अधिकार स्वतंत्रपणे वाचले पाहिजेत की ते कोणत्याही प्रकारे एकमेकांशी जोडलेले आहेत?

अधिकार कसे लिहीले किंवा तयार केले गेले आहे ह्याची काही आकृति आहे का?

स्वतःबद्दल विचार करा. तुम्हाला कोणता / कोणते अधिकार स्वतःसाठी सर्वात अर्थपूर्ण वाटतात? आता तुमच्या शेजाऱ्यांचा विचार करा. तुम्ही वर दिलेल्या प्रमाणेच ते उत्तर देतील, ह्याची कितपत शक्यता आहे? जर तुमच्या सर्वात मौल्यवान अधिकाराचा त्यांच्या सर्वात मौल्यवान अधिकाराशी संघर्ष झाला तर काय होईल?



# समानता संहिता - अनुच्छेद 14-18

ह्या विभागात आम्ही संविधानातील समानता संहितेचा अभ्यास करतो.

चला एका सोप्या प्रश्नाने सुरुवात करूया - तुमच्यासाठी समान शब्दाचा अर्थ काय आहे? जेव्हा आपण म्हणतो की दोन गोष्टी समान आहेत, तेव्हा आपला अर्थ असा होतो की त्या काही बाबतीत समान आहेत. गणितात हे अगदी सोपे आहे – 2 = 2. तथापि, जेव्हा दोन व्यक्तींना समान मानणे आणि त्यांच्याशी समान वागणाचा प्रश्न येतो, तेव्हा गणितीय अचूकता अशक्य आहे – आणि ते इष्टही नाही.

सर्व लोक मूलत: समान जन्माला येतात ह्या मूलभूत कल्पनेपासून सुरुवात करूया. तथापि, हा मूलभूत आधार जीवनाचा अनुभवांच्या वास्तविकतेमुळे मोठ्या प्रमाणात विचलित होतो. खरं तर, जात, वर्ग, लिंग, धर्म व इतर अनेक संदर्भ, माणूस ज्यांमध्ये माणूस जन्माला येतो, त्यांनवर अवलंबून समाजात तो कुठल्या पातळीवर आहे, त्याला कोणाशी समान वागणूक दिली जाते आणि त्याचे कोणते अधिकार आहेत. मग स संविधान ह्याला कसे सामोरे जाते?

अनुच्छेद 14 म्हणतो:
कायद्यापुढे समानता – राज्य कोणत्याही व्यक्तीला कायद्यापुढे समानता किंवा भारताच्या हद्दीतील कायद्यांचे समान संरक्षण नाकारणत नाही.

कायद्यासमोर समानता म्हणजे प्रत्येक व्यक्ती कायद्याच्या शासनाखाली कार्य करते आणि ह्याला अपवाद नाहीत. हे अगदी सरळ सरळ तत्त्व आहे. तथापि, दुसरा मुद्दा - कायद्यांचे समान संरक्षण, जरा अधिक क्लिष्ट आहे.

चला सहज सुरुवात करूया. ह्या परिस्थितीचा विचार करा:

शालेय वर्ग - 1ली, 2री, 3री, 4थी. तुम्ही 4थी इयत्तेतील गणिताचा प्रश्न 1ली इयत्तेच्या विद्यार्थ्याला द्याल का?

ह्याला मूलत: वर्गीकरणाचा सिद्धांत म्हणतात. ह्याचा अर्थ असा की समानता ही एक निश्चित संकल्पना नाही, जिथे सर्व व्यक्ती किंवा वस्तूंना त्यांची परिस्थिती आणि साधन विचारात न घेता समान वागणूक दिली जाते. उदाहरणार्थ, जर मी 1000 रुपये कमावले आणि तुम्ही 1,00,000 रुपये कमावले, तर सरकारला आमच्या दोन्ही उत्पन्नांवर 30% कर लावणे योग्य ठरेल का?

त्याचप्रमाणे, ट्रक आणि कारसाठी वेग मर्यादा, सेवानिवृत्तीचे वय, प्रवेशासाठी अंतिम मुद्दत, विशेष गुन्ह्यांसाठी विशेष न्यायालये अशा वर्गीकरणाला कायदा परवानगी देतो. आता कायद्याने असे वर्गीकरण करता येत असेल, तर अशा वर्गीकरणामुळे कोणाची तरी गैरसोय होणार नाही ना, ह्याची खात्री कशा आधारावर करावी?

वर्गीकरण करण्याच्या ह्या क्षमत्याला एक अट आहे. जात, लिंग किंवा धर्म ह्यासारख्या गैरसोयीस्कर घटकांवर आधारित एखाद्या व्यक्तीला वगळणारे वर्गीकरण प्रतिबंधित आहे. आपण जातिचे उदाहरण घेऊ. जातिव्यवस्था- ज्याने व्यक्तींच्या व्यवसायावर आधारित वर्ग निर्माण केले - तिच्या परिणामी समाजातील काही वर्गांना मोठ्या प्रमाणात अन्यायकारक वागणूक देण्यात आली. त्यामुळे संविधानाचा अनुच्छेद १७, जातिव्यवस्थेची कोणतीही प्रथा, विशेषत: अस्पृश्यतेची प्रथा ह्याला गुन्हा ठरवते. त्याचप्रमाणे अनुच्छेद 15 सामान्यतः जात, लिंग, धर्म, जन्मस्थान ही कारणे कोणाशीही भेदभाव करू शकत नाहीत. आणि त्याही पुढे, कायद्याची चूक सुधारण्याचीही जबाबदारी आहे. संविधानाचा समानता संहितेचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे *सकारात्मक कृतीची संकल्पना.*

सकारात्मक कृती ही दोन व्यक्तींमधील समानतेची हमी देण्यासाठी सरकारने केलेले प्रयत्न आहेत. त्यामुळे समाजातील ह्या वर्गांना विशेषाधिकारप्राप्त लोकांच्या बरोबरीने आणण्यासाठी विशेष तरतुदी करण्याची सरकारला संविधानाने परवानगी दिली आहे. सामाजिक न्याय सुनिश्चित करणे हा ह्यामागचा उद्देश आहे.

संविधानेत हमी दिलेल्या उर्वरित मूलभूत अधिकारांची जानकारी प्राप्त करा आणि समानतेच्या अधिकारासाठी आपण केलेल्या अध्ययना प्रमाणेत प्रत्येक खालील अधिकाराची तत्त्वे ओळखण्याचा प्रयत्न करा.



# सोपा व्यावहारिक सल्ला आणि गंभीरपणे विचार

मागील भागांमध्ये, तुम्ही एखाद्या देशासाठी संविधानाचा अर्थ काय, ते काय करते आणि मूलभूत अधिकारांवरील सर्वात महत्त्वाच्या अनुच्छेदाला नियंत्रित करणारी तत्त्वे ह्यावर विचार केला आहे. तुम्ही संविधानाचे अन्वेषण करत असताना, खालील सोपा व्यावहारिक नियम लक्षात ठेवा आणि नंतर गंभीरपणे विचार करा –

पुढील प्रश्नां चर्चेसाठी आम्ही तुमच्या समोर मांडतो :

- संविधान अचल आहे का? असे असावे का? की काळाबरोबर त्याची उत्क्रांती झाली पाहिजे?
- आपण वाचलेल्या शब्दांपलीकडे त्याचा अर्थ आहे का?
- ह्या शब्दांचा अर्थ काय, हे कसे ठरवायचे?
- कोणी ठरवायचे?

- भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारांचा अभ्यास म्हणजे कायदा बनवणे हा व्यक्ती, समाज आणि राज्य यांच्या स्पर्धात्मक हितसंबंधांमध्ये संतुलन राखण्याचा प्रश्न आहे, हे समजून घेणे. हे नेहमी संरेखित होत नाहीत, आणि ज्यावेळा त्यांनमध्ये परस्पर विरोध दिसतो, तेव्हा आपण कोठून सुरुवात केली हे समजून घेण्यासाठी व्हिजन बोर्ड – उद्देषिकेकडे परत वळावे.

- जे न्याय्य आणि वाजवी आहे त्यावर अनेकदा वाद होऊ शकतो परंतु सुदैवाने, आपल्याकडे नैसर्गिक न्याय नावाची एक संकल्पना आहे. नैसर्गिक न्याय हा स्वयं-स्पष्ट सत्यांचा एक संच आहे, ज्याच्या परिणामी जीवन किंवा स्वातंत्र्य गमावल्या जाणाऱ्या कोणत्याही दंडात्मक कारवाईचा सामना करणाऱ्या लोकांना कसे वागवले जावे, असे त्यांना वाटते. स्वयंस्पष्ट सत्याची संकल्पना समजावून सांगण्यासाठी डोळे बंद करून खालील दोन प्रश्नांवर मतदान करुया –

(अ) किती लोक मरण्याच्या अधिकाराचे समर्थन करतात आणि

(ब) किती लोक शिक्षा होण्यापूर्वी सुनावणी घेण्याच्या अधिकाराचे समर्थन करतात

तुम्हाला समजेल की तुमचा गट पहिल्या प्रकरणात विभाजित होईल आणि दुसऱ्या प्रकरणात एकमत होईल.

जसे जसे तुम्ही पुढचे धडे वाचाल, तसे तसे तुम्हाला संविधान न्यायालयांमध्ये, कायद्याची अंमलबजावणी आणि कायदेकर्त्यांसोबत कृतीत दिसेल. ज्या तत्त्वांबद्दल आम्ही इथे आणि इतर धड्यांमध्ये बोलत आहोत, त्यांची तपासणी करण्यासाठी ह्या धड्यांकडे वळने वाजिव आहे.



# शब्दकोष

## संविधानाचे अनुच्छेद:
हे क्रमांकित विभाग आहेत, जे सरकारचे विविध पैलू, मूलभूत अधिकार आणि नागरिकांची कर्तव्ये ह्यांची रूपरेषा देतात.

## संविधानेच्या अनुसूच्या:
हे संविधानाचे संलग्नक आहेत ज्यांमध्ये विविध प्रशासकीय आणि विधायी विषयांची तपशील आहे.

## समाजवादी:
सरकारने आर्थिक विषमता कमी करण्यासाठी आणि सर्व नागरिकांचे कल्याण सुनिश्चित करण्यासाठी काम केले पाहिजे, असे तत्त्व.

## धर्मनिरपेक्ष:
संविधानाचे आणखी एक मूलभूत तत्त्व, जे सांगते की भारताला अधिकृत राज्य धर्म नाही आणि धार्मिक स्वातंत्र्य आणि ते सहिष्णुतेला प्रोत्साहन देते.

## मूलभूत अधिकार:
मूलभूत अधिकार आणि स्वातंत्र्यांचा संच, जे प्रत्येक नागरिकाला संरक्षित आणि हमी दिलेले अधिकार आहेत, जसे समानतेचा अधिकार, भाषण स्वातंत्र्य आणि जगण्याचा अधिकार.

## कार्यकारी:
कायदे अंमलात आणण्यासाठी आणि देश चालवण्यासाठी जबाबदार सरकारची शाखा. त्यात राष्ट्रपती, पंतप्रधान आणि मंत्रीपरिषद ह्यांचा समावेश होतो.

## विधिमंडळ:
कायदे बनवण्यासाठी आणि पारित करण्यासाठी जबाबदार असलेली शाखा. भारतात, त्यात संसदेची दोन सभागृहे - लोकसभा आणि राज्यसभा आणि राज्य विधानमंडळे आहेत.

## न्यायपालिका:
कायद्याचा अर्थ परिभाषित करण्यासाठी आणि त्याचे समर्थन करण्यासाठी जबाबदार असलेली शाखा. भारतात, न्यायव्यवस्थेमध्ये सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालये आणि इतर सर्व न्यायालये समाविष्ट आहेत.

# धड़ा 3
# न्यायालय
## आपल्या अधिकारांची अंमलबजावणी करणे


एके काळी, उत्तर भारतातील एका छोट्या गावात मनोज नावाचा शेतकरी राहत होता. त्याने आपल्या शेतात खूप मेहनत केली आणि पिकांची लागवड करण्यासाठी बराच वेळ आणि पैसा गुंतवला. दुर्दैवाने, त्या वर्षी प्रतिकूल हवामानामुळे मनोजची पिके उद्ध्वस्त झाली आणि त्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले.
REJECTED
सुदैवाने मनोजने सरकारी विमा कंपनीकडून पीक विमा पॉलिसी घेतली होती. त्याने त्याच्या नुकसानभरपाईसाठी विमा कंपनीकडे संपर्क साधला, परंतु कंपनीने काही तांत्रिक कारणे सांगून त्याचा दावा नाकारला. फसवणूक आणि असहायता शोचणारा मनोज स्वतःला अडचणीत सापडला.
SCHOOL
मनोजला पींपळाच्या झाडाखाली एका कोपऱ्यात त्रासित आणि रुसलेला पाहून, विवेक – एक स्थानिक शाळेतील विद्यार्थी - त्याच्याकडे पोहोचला आणि त्यानी मनोजला विचारले की तो त्याची काही मदत करू शकतो का. मनोजने विवेकला आपली व्यथा सांगितली. काय करावे सुचेना म्हणुन विवेकलाही असहाय्य वाटू लागले.
LOCAL COURT
HEADMASTER
त्याने या घटनेचा उल्लेख त्याचा शाळेच्या मुख्याध्यापकांशी केला, ज्यांनी त्याला सरकारी विमा कंपनीविरुद्ध कायदेशीर पर्याय उपलब्ध करून देण्याबद्दल सांगितले. विवेकला कुठून सुरुवात करावी हे समजत नव्हते, म्हणून मुख्याध्यापकांनी मनोजला त्याच्या शाळेतील मित्राला भेटायला सांगितले, ज़ो स्थानिक न्यायालयात, कोर्ट सहायक म्हणून काम करत होता. विवेकने दुसऱ्या दिवशी त्याला भेटून माहिती गोळा केली. त्यानंतर विवेकने मनोजला सल्ला दिला आणि त्याला स्थानिक न्यायालयात भेट देण्याची विनंती केली.

कोर्टात काही वकिलांना भेटल्यानंतर मनोजला आत्मविश्वास वाटला आणि त्याने कोर्टात न्याय मिळवण्याचा निर्णय घेतला. त्याने स्थानिक ग्राहक मंचात केस दाखल केली, त्याच्या नुकसानीची भरपाई आणि विमा कंपनीवर चुकीच्या पद्धतीने विमा नाकारल्याबद्दल कारवाईची मागणी केली. सुरुवातीला मनोजला निधीची कमतरता आणि दीर्घ न्यायालयीन प्रक्रियेसह अनेक अडचणींचा सामना करावा लागला. पण त्याने आपल्या हक्कांसाठी लढण्याचा निर्धार केला आणि कोर्टात त्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी वकील नेमला. मनोजसाठी उपयोगी पडल्याने विवेकही आनंदित झाला होता.




अनेक महिन्यांच्या खटल्यानंतर न्यायालयाने शेतकऱ्याची अवस्था आणि त्याच्यावर झालेला अन्याय मान्य केला. न्यायमूर्तींनी विमा कंपनीला मनोजला भरपाई देण्याचे आदेश दिले. विमा कंपनीने या निर्णयाविरुद्ध अपील करण्याचा प्रयत्न केला, परंतु वरच्या न्यायालयाने जिल्हा न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला आणि कंपनीला मनोजला नुकसान भरपाई देण्याचे आदेश देण्यात आले.






मनोजचा विजय हा केवळ वैयक्तिक विजय नव्हता, तर पीक विम्याच्या दाव्यांबाबत अशाच प्रकारच्या समस्यांचा सामना करणाऱ्या इतर शेतकऱ्यांसाठीही याने कायदेशीर उदाहरण ठेवले. कायद्याने दिलेले अधिकार आणि भारतीय न्यायव्यवस्था हे न्यायाचे एक शक्तिशाली साधन कसे असू शकते याचे ज्वलंत उदाहरण मनोजचे प्रकरण ठरले. यामुळे शेतकरी आणि वंचित गटातील इतर व्यक्तींना कायदेशीर सहाय्य देण्यासाठी आता एक एनजीओ चालवणाऱ्या विवेकलाही खूप प्रेरणा मिळाली.




# न्यायालयांचा परिचय

मनोजची कथा प्रेरणादायी आहे पण त्यामुळे अनेक प्रश्नही निर्माण होतात - विवेक अल्पवयीन म्हणून न्यायालयाकडे जाऊ शकतो का? विवेक मनोजच्या वतीने गुन्हा दाखल करू शकला असता का? जनहितार्थ हा गुन्हा दाखल करता आला असता का? सार्वजनिक हिताचे प्रकरण काय आहे?

न्यायालय ही एक संस्था म्हणून भीतीदायक असू शकते. जर तुम्ही कधीही कोणत्याही कोर्टाला भेट दिल्यास, तुमच्या लक्षात येईल की प्रत्येकजण व्यस्त आणि महत्त्वाचा दिसतो - तेथे बाहेरील व्यक्तीला गांभीर्याने घेणे कठीण आहे, विशेषत: जेव्हा ते तरुण असतात कारण तेथे बरेच नियम आणि निर्बंध असतात. जणु काय तुम्ही तिथले नाहीतच?

प्रत्येक स्थानिक पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारीला कायद्यानुसार 'स्टेशन हाऊस ऑफिसर' असे संबोधले जाते, जे 'एसएचओ' ह्या लघुनामाने अधिक परिचित आहे. हा सहसा इन्स्पेक्टर स्तराचा अधिकारी असतो (ज्याच्या खांद्याच्या स्कंदभूषणावर तीन तारे असतात). उपनिरीक्षक किंवा 'एसआय' (ज्याच्या खांद्याच्या स्कंदभूषणावर दोन तारे असतात), सहाय्यक उपनिरीक्षक किंवा एएसआय (ज्याच्या खांद्याच्या स्कंदभूषणावर एक तारा असतो), हेड कॉन्स्टेबल (ज्याच्या वरच्या हातावर दोन शेवरॉन शैलीचे चिन्ह असते) आणि कॉंस्टेबल, हे सर्व एसएचओला मदद करतात. तपासाचे




पर्यवेक्षण सामान्यतः एएसआय दर्जाचे किंवा त्याहून उच्च दर्जाचे अधिकारी करतात.

समान्यतः पहाताना आपल्याला दिसेल की, प्रत्येक पोलिस ठाण्यामध्ये एक 'लॉक-अप' विभाग असतो ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीला खटल्याच्या संदर्भात २४ तासांपर्यंत - किंवा सक्षम न्यायालयाद्वारे अशा ताब्यात ठेवण्याची परवानगी असल्यास जास्त काळ ताब्यात ठेवता येते. प्रत्येक पोलीस ठाण्यात किमान एक महिला पोलीस अधिकारी असणे आवश्यक आहे.

जर तुम्ही पीडित असाल आणि एखाद्या प्रकरणाची तक्रार करण्यासाठी आला असाल, तर तुम्हाला 'ड्युटी ऑफिसर' कडे पाठवले जाण्याची शक्यता आहे. ड्युटी ऑफिसर हा एक पोलिस अधिकारी आहे जो पोलीस ठाण्याच्या प्रवेशद्वारा जवळ बसतो आणि ज्याची 'जनरल डायरी' किंवा 'डेली डायरी' राखण्याची जबाबदारी असते. ह्या डायरीमध्ये ठाण्यातील सर्व घडामोडींची अधिकृत नोंद, जसेकी प्रत्येक पीडित व्यक्तीची भेट, प्रत्येक अधिकाऱ्याची चळवळ आणि प्रत्येक प्रकरणाची नोंद असते. ड्युटी ऑफिसर तुम्हाला तुमची तक्रार लिखित स्वरूपात नोंदवण्यास सांगेल किंवा तो तुम्हाला ती कथन करण्यास सांगेल आणि नंतर तुमच्या कथनाच्या आधारे नोंद करेल. या प्रक्रियेमुळे तुमच्या तक्रारीला रजिस्टरमध्ये औपचारिक अनुक्रमांक दिला जातो, जो तुमच्या तक्रारीचा पहिला अधिकृत नोंद बनतो आणि सामान्यतः 'डायरी नंबर' म्हणून ओळखला जातो. हा 'डायरी नंबर' तुमच्या तक्रारीबद्दल भविष्यातील सर्व संप्रेषणासाठी एक संदर्भ बनतो. डायरी क्रमांक मिळवणे हे प्रथम माहिती अहवाल (एफआईआर) मिळवण्यासारखे नाही - अजूनही काही कड्या शिल्लक आहेत, जे आपण पुढे बघु.

तुम्ही उघड केलेला कथित गुन्हा काय आहे यावर अवलंबून, तुमची तक्रार कदाचित काही प्रकारच्या पडताळणीसाठी पोलिस ठाण्यामधील अधिक वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकी एकाकडे सूपूर्त केली जाईल. पडताळणी प्रक्रियेला 'प्राथमिक चौकशी' असेही म्हणतात आणि काही वेळा ती पूर्ण होण्यासाठी आठवडे लागू शकतात. पोलिस अधिकाऱ्याला तुमच्या तक्रारीत पुरेशी योग्यता आढळल्यास, पडताळणीचा परिणाम 'एफआयआर' नोंदवण्यात येईल.

ह्या विभागाच्या आधारे, तुम्हाला भेटण्याची शक्यता असलेल्या व्यक्ती, प्रक्रिया आणि कागदपत्रांची पडताळणी यादि तयार करा. तुम्हाला यापैकी किती ओळखता येतात हे पाहण्यासाठी तुमच्या स्थानिक पोलिस ठाण्याला भेट द्या.

# पोस्ट स्क्रिप्ट

हा दस्तऐवज तयार करताना, भारतातील गुन्हेगारी त्रिमूर्ती कायदे नवीन कायद्यांनी बदलले गेले. भारतीय न्याय संहिता २०२३ (बीएनएस) [यानी भारतीय दंड संहिता १८६० ला बदलले], भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ (BNSS) [यानी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ ला बदलले] आणि भारतीय साक्ष्य अधिनियम २०२३ (BSA) [यानी भारतीय पुरावा कायदा 1872 ला बदलले]. हे कायदे संसदेने मंजूर केले असले तरी ते अद्याप अंमलात आलेले नाहीत. सरकार एकाच वेळी हे कायदे अंमलात आणू शकते, किंवा जे जास्त शक्य वाटते तसे स्तब्ध प्रक्रियेद्वारे काही भाग अधिसूचित करून, हे कायदे अंमलात आणू शकते.

हे नवीन कायदे आल्यानंतर महत्त्वाचे प्रश्ण निर्माण होतात. आमच्यासाठी सर्वात मोठा प्रश्ण असा आहे की, मी वाचलेला दस्तऐवज अनावश्यक झाले आहे का? सुदैवाने, याचे उत्तर स्पष्ट 'नाही' असे आहे. नवीन कायद्यांनी फौजदारी प्रक्रियेची रचना आणि कार्यपद्धती अजिबात बदललेली नाही आणि जोपर्यंत नवीन कायदे अंमलात आणले जात नाही तोपर्यंत IPC, Cr.P.C आणि IEA च्या विद्यमान त्रिमूर्तीद्वारे फौजदारी प्रक्रिया चालवळी जाईल. नवीन कायदे अंमलात आणल्यानंतरही, पूर्वीचे कायदे अस्तित्त्वात असताना सुरू झालेली कोणतीही प्रक्रिया, पूर्वीच्या कायद्यांद्वारेच नियंत्रित केली जाईल.

नवीन कायद्यांद्वारे फौजदारी प्रक्रियेतील बदलांच्या संदर्भात, आपण दस्तावेज पडताळण्याच्या दृष्टीकोणा वर अवलंबून राहुन कार्य करुया. प्रथम आपण प्रक्रियेच्या जाळ्यात अडकलो तर काय होते ते पाहू, आणि नंतर जर आपण स्वतःच्या निवारणासाठी खटला नोंदवल्यास काय करावे याच्या कडे वळून बघु .
BNSS ने तपास आणि चाचण्यांच्या काही भागांसाठी कालमर्यादा लागू केली आहे, ह्या अपेक्षेने की ह्यामुळे प्रक्रियेला गती मिळेल. तथापि, तपास आणि चाचण्या कशा चालवल्या जातात या संरचनेत कोणतेही बदल नाहीत. त्याचप्रमाणे, अटक करण्याच्या पोलिसांच्या अधिकारांमध्ये कोणतेही बदल करण्यात आले नाहीत, परंतु प्रलंबित तपासादरम्यान व्यक्तींना ताब्यात घेण्याचे आदेश देण्यासाठी न्यायाधीशांनां ज्यास्त अधिकार देण्यात आले आहे असे दिसते.

पीडितांसाठी, BNSS ने तक्रार कोठे दाखल करता येतील या संदर्भात नियमामध्ये शिथिलता आणली आहे, ज्यामुळे आपली तक्रार कोठे दाखल करायची हे ठरवण्यासाठी शहराच्या कुठल्या भागात कोणत्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत आहे हे शोधण्यासाठी आपल्याला १००/११२ वर फोन करण्याची आवश्यकता नाही.

वेळ-मर्यादांना गती मिळाल्यामुळे नैसर्गिकरित्या प्रक्रियेला गती अपेक्षित आहे, जेणे करुन पीडितांना देखील मदत होइल. पण त्याचवेळी न्याय मागणाऱ्या पीडितांसाठी काही नवे अडथळे येतील.

तुम्हीजर पोलिसांकडे न जाता थेट न्यायालयात तक्रार दाखल केली तर BNSS अंतर्गत आता आवश्यक आहे की, न्यायालयाने तुमच्या तक्रारीवर कोणतीही कारवाई करण्याचा निर्णय घेण्याआधी आरोपीचे म्हणणे सुद्धा ऐकून घेतले पाहिजे.

तुम्हाला जर जुने कायदे आणि नवीन कायदे यांच्यातील फरक आणि समानता शोधण्यात अधिक रुचि असल्यास, तर तुम्ही मॉडर्न क्रिमिनल लॉ रिव्ह्यू [https://crimlrev.net/mclr-resources-2/] वेबसाइटवर ‘इंडिया’ अंतर्गत केलेले नोंद पहा जेथे एकाच ठिकाणी विविध साहित्य एकत्रित केले आहे.

# शब्दकोष

## अटकपूर्व जामीन:
अटक करण्यायोग्य दखलपात्र (कॉग्निझेबल) आणि अजामीनपात्र गुन्ह्याबाबत तिच्यावर आरोप केले गेले आहेत ह्याची जाणीव असलेली व्यक्ती ह्या उपायासाठी अर्ज करू शकते, ज्याचा परिणामी पोलिसांना अटक केल्यावर जामीन देण्याचे निर्देश न्यायलयकडून दिले जातात.

## दखलपात्र गुन्हे:
ज्या गुन्ह्यांसंर्दभात पोलिसांना वॉरंट शिवाय एखाद्या व्यक्तीला अटक करण्याचा अधिकार आहे. निशावर आरोप असलेल्या काही गंभीर गुन्ह्यांसाठी वॉरंटची गरज नसते आणि अश्या व्यक्तीला अटक करण्याचा अधिकार पोलिसांना असतो.

## न्यायालयीन वॉरंट:
हे कायदेशीर दस्तऐवज आहेत जे पोलिसांना एखाद्याला अटक करण्यासाठी, शोधण्यासाठी किंवा कोणाला ताब्यात घेण्यासाठी किंवा काहीतरी जप्त करण्यासाठी अधिकृत करतात. ते पुरावे तपासल्यानंतर आणि संभाव्य कारण असल्यानंतर दंडाधिकारी किंवा न्यायाधीशाद्वारे जारी केले जातात. भारतातील न्यायालयीन वॉरंट वेगवेगळ्या प्रकारचे असू शकतात, जसे की अटक वॉरंट, झडती वॉरंट, प्रोडक्शन वॉरंट किंवा रिमांड वॉरंट.

## अभियोग:
गुन्हेगारीचा आरोप असलेल्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कार्यवाही चालवणे. ह्या शब्दाचा प्रयोग दोन प्रकरणांचा वर्णन करण्यासाठी वापरला जातो, पहिले, खटला चालवण्याची प्रक्रिया व दूसरे कायदेशीर युक्तिवाद करणारा आणि न्यायाधीशासमोर सादर करणारा की, गुन्ह्याचा आरोपी दोषी आहे.

# घडा-5
# सहभागी नागरिक व्हा


कल्पना करा की तुम्हाला घर बांधायचे आहे. स्पष्टपणे तुम्ही ते स्वतः तयार करू शकत नाही. तुम्ही तुमच्या मित्रांना बोलवून त्यांना पटवून द्या, की जर त्यांनी तुम्हाला घर बांधण्यात मदत केली तर त्यांच्यापैकी प्रत्येकजण घरात राहू शकेल. आता अशी कल्पना करा की तुमच्यापैकी 50 जण एकत्र घर बांधण्याचा प्रयत्न करत आहेत.
पण घर कसे बांधायचे ह्याबद्दल तुमच्या सर्वांच्या वेगवेगळ्या कल्पना आहेत. तुमच्यापैकी काहींना असे वाटते की त्याचे किमान दोन मजले असावेत आणि काहींना वाटते की ते फक्त एकच मजल्याचे असावे. प्रत्येकजण ओरडत आपले विचार समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. साहजिकच, समोरची व्यक्ती काय बोलत आहे, हे कोणीही ऐकू शकत नाही.
त्यामुळे शेवटी प्रत्येक गट त्यांच्या गटातर्फे बोलण्यासाठी एक व्यक्ती निवडतो. ते दोन वक्ते, आपण त्यांना प्रतिनिधी म्हणूया, एकमेकांशी बोलून शेवटी ह्या सहमतिवर पोचतात की सगळ्यांसाठी दोन मजले अधिक चांगले असतील. ज्यांना दोन मजले हवे होते त्या लोकांच्या गटाचा प्रतिनिधी मग घराचे वेगवेगळे भाग बांधण्यासाठी प्रत्येकाला वेगवेगळ्या गटात संघटित करतो.

ह्या स्थितीत, ज्या लोकांना घर बांधायचे आहे ते देशाचे नागरिक आहेत आणि हे दोन प्रतिनिधी संसद आहेत. देशात खूप लोकं आहेत, त्यामुळे प्रत्येकाचे मत जाणून घेणे शक्य नाही. प्रत्येकाचे मत ऐकले जाईल ह्याची खात्री करण्यासाठी आपण सर्वजण प्रतिनिधि निवडतो. संसदेत आमच्या बाजूने बोलणाऱ्या राजकारणी प्रतिनिधीला, आपण मत देतो.

आपल्या संविधानानुसार 18 वर्षांपेक्षा जास्त वयाची व्यक्ती मतदान करू शकते, वाहन चालक लायसन्स मिळवून गाडी चालू शकते आणि स्वतःच्या इच्छेनुसार करार करू शकते. म्हणजेच, कायदा मानतो की 18 वर्षांपासूनच्या व्यक्तीवर स्वतंत्र निर्णय घेण्यासाठी आणि त्या निर्णयांची जबाबदारी घेण्यासाठी त्यावर विश्वास ठेवला जाऊ शकतो. आणि जिथे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आहे तिथे ते स्वातंत्र्य वापरण्याची जबाबदारी देखील आहे. वास्तविक बदल करण्यास सक्षम होण्यासाठी तुम्हाला जागरूक आणि सक्रिय असणे आवश्यक आहे आणि तुमच्या मित्रांना देखील तसे होण्यास मदत करणे आवश्यक आहे.

आपल्या स्वातंत्र्याचा वापर करण्याची जबाबदारी बजावण्यासाठी असलेल्या महत्त्वाच्या जागांपैकी एक म्हणजे राजकारण. तुम्हाला असे वाटेल की राजकारण हे फक्त राजकारणीच करतात आणि त्यात तुम्ही बदल करू शकत नाही. हे सत्य नाही! असा विचार करणे चूकीचे ठरेल. मग तुम्ही अशा लोकांच्या हातात बदल घडवून आणण्याची शक्ती सोडत आहात, ज्यांना कदाचित तुमच्या समस्या समजत नसतील किंवा ज्यांना त्यांची माहिती ही नसेल. त प्रवेश करणे आवश्यक आहे. त्या स्तरावर बदल घडवून आणण्याचे ते सर्वात शक्तिशाली साधन आहे. राजकीय प्रक्रियेचे वेगवेगळे भाग आहेत आणि वेगवेगळ्या मुद्द्यांमध्ये तुम्ही त्यात सहभागी होऊ शकता. समाजात आणि तुम्ही ज्या ठिकाणी राहता, त्या ठिकाणी बदल घडवून आणण्यासाठी तुम्हाला राजकारणाच्या क्षेत्रात प्रवेश करणे आवश्यक आहे. त्या स्तरावर बदल घडवून आणण्याचे ते सर्वात शक्तिशाली साधन आहे. राजकीय प्रक्रियेचे वेगवेगळे भाग आहेत आणि वेगवेगळ्या मुद्द्यांमध्ये तुम्ही त्यात सहभागी होऊ शकता.




तर राजकीय प्रक्रियेत तुम्ही कोणत्या मार्गाने सहभागी होऊ शकता? राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याचे ५ मार्ग:

मतदान करा
आरटीआय अर्ज दाखल करा
तुमच्या धोरणकर्त्यांशी बोला
सराविक विषय हेतु समर्थन करा
मुद्द्यासाठी वकिली करा किंवा राजकारणी व्हा




# कोण मतदान करू शकतो

संसदेची शक्ती तुमच्याकडून आणि भारतातील सर्व नागरिकांकडून येते- ती तुमच्या मताद्वारे येते! तुमचे लिंग, जात, धर्म किंवा इतर कोणतीही ओळख ह्यावर काहीही फरक पाडू शकत नाही. तुमचे वय १८ वर्षांवरील आणि तुम्ही भारतीय नागरिक आहे का? तुम्हाला मतदान करण्याचा अधिकार आहे, आणि हे तुमचे कर्तव्यही आहे.

मतदार यादीमध्ये येण्यासाठी नोंदणी कशी करावी हे माहित नाही? भारतीय निवडणूक आयोगाची वेबसाइट पहा - https://eci.gov.in/voter/voter-registration/

कलम ३२५ - ह्या अनुच्छेदात अशी तरतूद आहे की भारतीय निवडणूक आयोगाने प्रत्येक मतदारसंघासाठी मतदार यादी तयार करावी. मतदार यादीत मतदारसंघातील सर्व पात्र मतदारांची नोंद असते. ह्या कलमात पुढे म्हटले आहे की, धर्म, वंश, जात, लिंग किंवा त्यांपैकी कोणत्याही कारणास्तव मतदार यादीत त्यांची नावे समाविष्ट करणे नाकारता येत नाही. ह्याचा अर्थ असा की, जर तुम्ही तुमचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांकडे गेलात आणि त्यांनी तुमची जात, धर्म, लिंग किंवा वंश हे कारण सांगून तसे करण्यास नकार दिला तर तो अधिकारी संविधानाच्या विरोधात काम करतो!

कलम 326 - ह्या अनुच्छेदात अशी तरतूद आहे की 18 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या प्रत्येक भारतीय नागरिकाला आणि कायद्याद्वारे अपात्र न ठरलेल्या व्यक्तिला मतदार म्हणून नोंदणी करण्याचा अधिकार आहे.

# आपला मतदानाचा अधिकार -

## संविधान काय म्हणते?

कलम ३२४ - हे कलम भारताच्या निवडणूक आयोगाला राष्ट्रपती, उपराष्ट्रपती ह्यापदांचे, संसदेची दोन्ही सभागृहे आणि राज्य विधानसभेच्या निवडणुका घेण्यासाठी जबाबदार ठरवते. हे कलम निवडणूक आयोगाला अशा निवडणुकांवर नियंत्रण आणि पर्यवेक्षण देखील प्रदान करते.

स्वातंत्र्याच्या क्षणापासून १८ वर्षांवरील प्रत्येकाला मतदानाचा अधिकार देण्याचे ठरवून भारत काहीतरी मूलगामी करत होता. त्यावेळी इतर अनेक प्रगत राष्ट्रांमध्ये महिला, कृष्णवर्णीय किंवा अल्पसंख्याक धर्मातील लोकांना मतदानापासून वगळण्यात आले होते ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच, जेव्हा तुम्ही पहिल्यांदा मतदानासाठी बाहेर पडता, तेव्हा तुम्ही संविधान सभेच्या ह्या ऐतिहासिक निर्णयाचे पुनरुज्जीवन करत आहात.




# मतदानासाठी नोंदणी करा.

लोकप्रतिनिधी कायदा, 1950 खूप महत्त्वाचा आहे कारण तो मतदार याद्या कशा तयार करायच्या आहेत आणि कोणत्या कारणांमुळे कोण ह्या याद्यांमध्ये समाविष्ट होउ शकत नाहीत ह्याची माहिती देतो.
तर कोण मतदान करू शकत नाही?

- तो, जो भारताचा नागरिक नाही
- तो, ज्याला मानसिकदृष्ट्या सक्षम नसल्याचे न्यायालयाने म्हटले आहे
- तो, जो भ्रष्ट व्यवहार किंवा निवडणूक संबंधित इतर गुन्ह्यांसाठी दोषी ठरलेला आहे.

तुम्हाला मतदानासाठी अपात्र ठरवले जाणार नाही ह्याची खात्री करण्यासाठी येथे काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

- फक्त एकाच मतदारसंघात मतदार म्हणून नोंदणी करा
- मतदारसंघात मतदार म्हणून अनेक वेळा नोंदणी करू नका
- तुम्ही राहता त्या मतदारसंघात तुमची नोंदणी झाली असल्याची खात्री करा

मतदानाचा अधिकार असलेल्या प्रत्येकाला असे करण्यापासून रोखले जाणार नाही ह्याची खात्री करणे हे भारतीय निवडणूक आयोगाच्या कामांपैकी एक आहे. परंतु तुम्ही मतदान करण्यासाठी नोंदणीकृत आहात ह्याची खात्री करणे, ही तुमची जबाबदारी आहे. मतदार नोंदणी अधिकारी तुमचा अर्जांची पूर्ण चौकशी करतील आणि त्यानंतरच तुम्हाला मतदार यादीत समाविष्ट केले जाईल.

निवडणूक आयोगाच्या मते, 2014 च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी, 18-19 वयोगटातील 5.04 कोटी भारतीयांपैकी केवळ 45% मतदानासाठी नोंदणीकृत होते. म्हणजे 27310000 तरुण भारतीय त्या निवडणुकीत मतदान करू शकले नाहीत आणि केले नाहीत. म्हणजे २.७३ कोटी तरुण भारतीयांचा आवाज संसदेत ऐकू आला नाही. इतरांना तुमच्यासाठी विचार करू देऊ नका आणि तुम्हाला नको असलेले भविष्य घडवू देऊ नका. मतदान करून तुमचा पाठिंबा किंवा विरोध व्यक्त करा. तुमचा आवाज ऐकला जात असल्याची खात्री करूण घ्या.

पुढच्या निवडणुका कोणत्या आणि कधी आहेत हे पहा? ह्या सार्वत्रिक निवडणुका, राज्य विधानसभा निवडणुका, नगरपालिका/ पंचायत किंवा स्थानिक संस्थांच्या निवडणुका किंवा पोटनिवडणुका असू शकतात.

हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे कारण प्रस्तावना 'आम्ही भारताचे लोक' ह्या शब्दांनी सुरू होते आणि 'हे संविधान स्वतःला देऊ' ह्या शब्दाने संपते. आपणच लोक मतदान प्रक्रियेत सहभागी होऊन आपल्या लोकशाहीचे रक्षण करतो.



संसदेची शक्ती तुमच्याकडून आणि भारतातील सर्व नागरिकांकडून येते- ती तुमच्या मताद्वारे येते! तुमचे लिंग, जात, धर्म किंवा इतर कोणतीही ओळख हे काहीही फरक पाडू नाहीत. तुमचे वय १८ वर्षा किंवा अधिक आहे का आणि तुम्ही भारतीय नागरिक आहात का? असे असेल तर तुम्हाला मतदान करण्याचा अधिकार आहे आणि हे तुमचे कर्तव्यही आहे.

सूचना का अधिकार (RTI) अधिनियम, 2005, कार्यकर्ते आणि पत्रकारांनी केलेल्या दीर्घ आंदोलनाचे फलित आहे आणि नागरिक समाजाच्या कृतीचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. या अधिनियमाचा इतिहास जाणून घ्या की तो कसा अस्तित्वात आला.

# आरटीआई कायदा काय आहे?

❀ कायदा सांगतो की सर्व नागरिकांना माहितीचा अधिकार आहे. सर्व नागरिक कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडून माहिती घेऊ शकतात.

**उदाहरणार्थ, भारसिंग वसावा हे दक्षिण गुजरातमधील सामोर नावाच्या गावातील आदिवासी असून त्यांनी ७वीपर्यंत शिक्षण घेतले आहे. त्यांची पार्श्वभूमि किंवां पात्रता काही का असेना, भारताचा एक नागरिक म्हणून त्यांना त्यांच्या गावातील रस्त्याच्या दर्जाविषयी जाणून घेण्याचा अधिकार आहे.**



❀ सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित कोणताही कायदा, धोरण किंवा निर्णय ह्यांच्याशी संबंधित माहिती अधिकार कायद्यांतर्गत विविध प्रकारची माहिती मागवली जाऊ शकते. हे, अंतर्गत मेमो, ईमेल, मते, सल्ला, प्रेस प्रकाशने, परिपत्रके, आदेश, अधिकृत कार्यवाहीसंबंधी कागदपत्रे, नमुने इत्यादी असू शकतात.







लक्षात ठेवा की...

- तुम्ही सीडी किंवा पेनड्राइव्ह सारख्या इलेक्ट्रॉनिक स्वरूपात दिलेल्या माहितीची प्रत मागू शकता. तुम्ही जाऊन रेकॉर्डची तपासणी करण्यास आणि स्वतः नोंद्व घेण्यास देखील सांगू शकता.
- ह्या कायद्याने सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी स्वतःच्या वेबसाइटवर सहज वापरता येण्याजोगी सर्व माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.
- आरटीआई विनंती पाठवताना तुम्हाला ती माहिती मागण्यासाठी कोणतेही कारण देण्याची गरज नाही.
- सार्वजनिक प्राधिकरणाने मागितलेली माहिती 30 दिवसांच्या आत पुरवणे कायद्याने आवश्यक आहे.
- सार्वजनिक प्राधिकरणाने ३० दिवसांच्या आत प्रतिसाद न दिल्यास किंवा विनंती नाकारल्यास किंवा अपूर्ण किंवा असमाधानकारक प्रतिसाद दिल्यास, माहितीची विनंती करणारा नागरिक त्याविरुद्ध अपील करू शकतो. ह्यासाठी, प्रत्येक राज्यात स्थापन झालेल्या राज्य माहिती आयोगाकडे आणि पुढे केंद्रीय माहिती आयोगाकडे अपील करता येईल..
- • कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाने माहितीच्या अधिकाराचे किंवा कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास, त्यांना दंड होऊ शकतो.

# आरटीआय कसा दाखल करावा

आरटीआय दाखल करणे ही अतिशय सोपी आणि किफायतशीर प्रक्रिया आहे.

पायरी 1:
योग्य सार्वजनिक प्राधिकरण आणि सार्वजनिक माहिती अधिकारी ओळखा, जे तुम्ही शोधत असलेली माहिती देऊ शकतात[1].

पायरी २: अर्ज लिहा. भाषा सोपी आणि स्पष्ट असावी. खालील नमूद करणे आवश्यक आहे
- नाव
-पत्ता
- पेमेंटची पद्धत
- तुम्हाला रेकॉर्डची तपासणी करायची असल्यास किंवा रेकॉर्डची प्रत हवी असल्यास संपर्क तपशील तुमच्या अर्जात नमूद करा

पायरी 3: अर्जासाठी ऑनलाइन किंवा कोणत्याही पोस्ट ऑफिसद्वारे मनीऑर्डरने 10 रुपये भरा. काही प्रकरणांमध्ये ह्यातून सूट दिली जाऊ शकते, उदाहरणार्थ दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी (बीपीएल). अशा सूटचा दावा करण्यासाठी, बीपीएलशी संबंधित असल्याचा पुरावा प्रदान करणे आवश्यक आहे.

क़दम 4 अर्ज प्रस्तुत करा. हे ऑफलाइन, पोस्टद्वारे किंवा ऑनलाइन सरकारी पोर्टलद्वारे दाखल केले जाऊ शकते.




ह्याची खात्री करा
- आरटीआय कायदाच्या[1] कलम 8 किंवा 9 अंतर्गत प्रकटीकरणातून सूट मिळालेली माहिती मिळवणे टाळा
- तुम्ही शोधत असलेली माहिती सार्वजनिक डोमेनमध्ये किंवा सार्वजनिक प्राधिकरणाच्या वेबसाइटवर[1] उपलब्ध आहे का ते तपासा.
- केवळ सार्वजनिक प्राधिकरणाच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेली माहिती मिळवा.
- केवळ अशीच माहिती मिळवा जी विहित मुदतीत दिली जाऊ शकते आणि सार्वजनिक प्राधिकरणावर अनावश्यक भार पाडणार नाही[2].
- केवळ अशीच माहिती शोधा जी काही सार्वजनिक हित किंवा क्रियाकलापांशी संबंधित असेल.
- फालतू, त्रासदायक किंवा दुर्भावनायुक्त अनुप्रयोग दाखल करणे टाळा[2].

# आरटीआय वापरण्यात अडथळे

सार्वजनिक अधिकारी सवलतीचे कारण / कारणे सांगून माहिती नाकारू शकतात

सार्वजनिक अधिकारी विलंब करू शकतात किंवा अपूर्ण माहिती प्रदान करू शकतात. नागरिकांकडून अपील दाखल केले जात असतानाही अपीलांचा मोठा अनुशेष असल्याने प्रतिसाद देण्यास विलंब होऊ शकतो.





वसावा हे खरेच आरटीआय योद्धा आहेत पण त्यांना प्रभावी योद्धा बनवणारी गोष्ट म्हणजे ते माहिती मिळवण्यावर थांबले नाहीत. त्यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे संबंधित प्राधिकरणाशी संपर्क साधूण ओळखलेल्या समस्येचे निराकरण केले जाईल ह्याची त्यांनी खात्री केली. करण्यासाठी तो माहिती मिळणे ही एक महत्त्वाची पायरी आहे परंतु पुढील पायरी- कृती करणे तेव्हडीच महत्वपूर्ण आहे! नागरिक म्हणून आपण रस्ता बनवू शकत नाही, परंतु त्यासाठी जबाबदार असलेल्या लोकांशी बोलून त्याचा पाठपुरावा करू शकतो.

ज्याप्रमाणे आरटीआय दाखल करण्यासाठी कोणाशी संपर्क साधावा हे जाणून घेणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे तुम्हाला एखाद्या नागरी समस्येचे निराकरण करण्यासाठी कोणाशी संपर्क साधावा लागेल हे देखील जाणून घेणे आवश्यक आहे. मग बदल घडवूण आणण्यासाठी तुम्हाला कोणाशी संपर्क करायला हवा?

# धोरण आणि कायदा कोण बनवतो?

कायदेमंडळे ही कायदा बनवणारी संस्था आहेत. घराच्या इमारतीच्या उदाहरणात, हे असे लोक आहेत जे प्रत्येकाचे प्रतिनिधित्व करतात आणि बांधायचे मजल्यांची संख्या आणि घराची सामान्य रचना ह्याबद्दल अंतिम निर्णय घेतात. आपल्या संविधानात ज्या विधायी संस्थांची तरतूद करण्यात आली आहे ते हेः

- लोकसभा आणि राज्यसभा ह्या दोन सभागृहांसह भारताची संसद
- प्रत्येक राज्यात विधानसभा आणि काही राज्यांमध्ये विधान परिषद
- स्थानिक पातळीवर नगर परिषद किंवा पंचायत
- त्यांनी लोकशाही प्रक्रियेद्वारे आमच्यासाठी कायदे करणे आवश्यक आहे- म्हणजे कायदा बनवताना त्यांना भागधारकांशी चर्चा करावी लागते. ह्या हेतुने विधान मंडळे समित्या स्थापन करतात. ज्या प्रस्तावित कायदे आणि धोरणांवर लोकांकडून टिप्पण्या मागवतात.

उदाहरणार्थ, 2021 मध्ये, महिला आणि युवा प्रकरणांवरील संसदेच्या समितीने मुलींचे विवाहयोग्य वय 21 वर्षांपर्यंत वाढवण्याच्या प्रस्तावावर टिप्पण्या आमंत्रित केल्या आणि तरुण आणि महिला गटांकडून बरेच इनपुट प्राप्त झाले.



# धोरण आणि कायद्याची अंमलबजावणी कोण करतो?

कायदेमंडळाने बनवलेले कायदे अंमलात आणण्यासाठी आणि शासनाचे कार्य पार पाडण्याची जबाबदारी कार्यकारी किंवा सरकार ह्यांची आहे. घरबांधणीच्या उदाहरणामध्ये हे ते लोक आहेत, जे लोकप्रतिनिधींनी ठरविल्याप्रमाणे प्रत्यक्षात घर बांधतात. सरकार योजना, कार्यक्रम, नियम आणि कायदे तयार करते, ज्यामुळे ती कायदे अंमलात आणू शकते.

उदाहरणार्थ, भारत सरकारने नवीन शैक्षणिक धोरणावर व्यापक सल्लामसलत केली. त्यावर 2 लाखांहून अधिक सूचना प्राप्त झाल्या, ज्या 20202 मध्ये जाहीर केलेल्या अंतिम धोरणाला आकार देण्यापूर्वी विचारात घेतल्या गेल्या.

# सार्वजनिक सल्लामसलत मध्ये सहभागी व्हा

2014 मध्ये सरकारने मांडलेल्या प्री-लेजिस्लेटिव्ह कन्सल्टेशन पॉलिसी (PLCP) द्वारे कोणतेही विधेयक, नियम, योजना इत्यादी तयार करण्यापूर्वी सार्वजनिक सल्लामसलत करण्यासाठी अधिक प्रयत्न केले गेले आहेत. धोरण विशेषत: हे ओळखते की सार्वजनिक सल्लामसलत केल्याने सरकारला अधिक पारदर्शक होण्यास आणि चांगली माहिती मिळवण्यास मदत करते. हे एकमत निर्माण करण्यास देखील मदत करते आणि कायदा किंवा योजना अंमलात आणली जात असताना कमी प्रतिकार होतो. सार्वजनिक सल्लामसलत हे सुनिश्चित करते की कायदा किंवा धोरण तयार करण्यापूर्वी विविध भागधारकांचे मत विचारात घेतले जाते.

# सार्वजनिक सल्लामसलत महत्वाचे का आहे?

i आमचे निवडून आलेले प्रतिनिधी इतर लोक काय विचार करतात, हे समझतात
ii विविध भागधारकांची मते विचारात घेतली जातात
iii ह्या माहितीच्या आधारे सर्वोत्तम संभाव्य कायदा किंवा योजना तयार केली जाऊ शकते.

1. तुम्हाला कोणताही कायदा, धोरण किंवा योजना माहीत आहे का ज्यावर सरकारने टिप्पण्या मागवल्या होत्या? असेल तर तो कोणता कायदा, धोरण किंवा योजना होती?
2. तुम्ही कधीही कोणत्याही प्रस्तावित कायदा, धोरण किंवा योजनेवर सार्वजनिक सल्लामसलतीत भाग घेतला आहे का? तुमचा अनुभव कसा होता? सल्लामसलतीत सहभागी होण्यासाठी तुम्ही कोणत्या प्रक्रियेचे पालन केले, तुम्ही त्याची तयारी कशी केली? ह्या क्रियेचा परिणाम काय होता, तुमचा अभिप्राय आणि माहिती कायद्यात किंवा योजनेत समाविष्ट करण्यात आली होती का?
3. तुम्ही कोणत्याही प्रस्तावित कायदा, धोरण किंवा योजनेबाबत भविष्यातील कोणत्याही सार्वजनिक सल्लामसलतीत सहभागी व्हाल का?
4. तुम्ही तुमच्या आजूबाजूच्या लोकांना, तरुणांना देखील सहभागी नागरिक बनण्यासाठी कसे पटवून द्याल?

# सहभागी नागरिक बनण्याचे कौशल्य कसे शिकावे ?

- तुमचा मताला आकार देण्यासाठी तज्ज्ञांशी संवाद साधा.
- संसद आणि विधानसभांचे सत्र पहा
- कायदे, मसुदा तयार केल्या जात असलेल्या योजनांशी संबंधित बातम्यांचा पाठपुरावा करा

|

*आजकाल अनेक सरकारी विभाग फेलोशिपद्वारे तरुणांना विविध कायदे आणि योजनांच्या अंमलबजावणीसाठी थेट प्रशासनासोबत काम करण्यासाठी सहभागी करून घेतात. उदाहरणार्थ, मुख्यमंत्री शहरी नेते फेलोशिपद्वारे, युवक दिल्ली सरकारमधील विविध मंत्र्यांसोबत काम करू शकतात.*

# धोरणनिर्मितीमध्ये योगदान देण्यात येणारे अडथळे

- आमचे निवडून आलेले प्रतिनिधी किंवा सरकार ह्यांना सार्वजनिक सल्लामसलत करण्यात रूचि नसावी
- काही कायदे आणि योजना, ज्यांच्यावर सल्लामसलत केली जाते, ते खूप तांत्रिक असू शकतात व सामान्य नागरिकां किंवा तरुण गटांना ते समजणे कठिण होऊ शकतात.
- ज्या भाषेत आणि ज्या पद्धतीने सल्लामसलत केली जाते, ती देखील अनेक लोकांना त्यात सहभागी होण्यापासून वगळू शकते.
- अनेक वेळा लोकांना विशेषतः तरुणांना माहिती कशी किंवा कुठे शोधावी हे माहित नसते किंवा त्यांच्या जीवनातील दररोजच्या संघर्षात ते इतके व्यस्त असतात की ते कदाचित अशा उपक्रमांकडे लक्ष देऊ शकत नाहीत.




वकिली म्हणजे काय?

**ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी येथे वकिलीच्या यशस्वी उदाहरणाची कथा आहे.**
**1990 मध्ये मध्य राजस्थानातील खेड्यापाड्यातील कामगार आणि शेतकऱ्यांनी एकत्र येऊन मजदूर किसान शक्ती संघटना (MKSS) ही सामुदायिक संस्था स्थापित केली. मूळ संघर्ष एका जमीनदाराविरुद्ध होता, ज्याने सामुदायिक जमिनीवर बेकायदेशीरपणे कब्जा केला होता. हा संघर्ष कालांतराने किमान वेतनासाठीच्या संघर्षात परिवर्तित झाला. तथापि, त्यांच्या लक्षात आले की त्यांचा संघर्ष खरोखर प्रभावी होण्यासाठी त्यांना पंचायतींसह स्थानिक सरकारी संस्थांच्या आर्थिक नोंदींची जानकारी उपलब्ध करूण घेणे  आवश्यक आहे. अशा प्रकारे सरकारला जबाबदार धरता यावे म्हणून माहितीच्या महत्वपूर्णतची वास्तविकपणे गरज जाणवू लागली. सुरुवातीला जो स्थानिक संघर्ष होता संपूर्ण देशव्यापी झाला आणि तो 2005 मध्ये माहिती अधिकार कायद्या स्वरूपाने त्याने कळस गाठळा.  आणि हे सर्व साध्य व्हाय्याचे कारण म्हणजेच लोक त्यांच्या हक्कांच्या मागणीसाठी आवाज उठवण्यास एकत्र आले!**




ही कथा सूचित करते की बदल घडण्यासाठी लोकांनी एकत्र येणे, संघर्ष करणे, कायद्यात बदल करण्याची मागणी करणे आणि तो बदल घडवून आणण्यासाठी काम करणे आवश्यक आहे. म्हणूनच वकिली महत्त्वाची आहे कारण आपण स्वतःसाठी बोललो नाही तर कोणीही आपल्या बाजूने बोलणार नाही.

# ठरावित ध्येयासाठी योजना करा

खाली आम्ही धोरणांबद्दल काही सूचना दिल्या आहेत, ज्या तुम्ही एखादे ध्येय मिळवण्यासाठी समर्थन देण्यास वापरू शकता. कोणतीही एकल रणनीती स्वतःहून चालणारच असे नाही, त्यामुळे तुम्हाला त्यांचे संयोजन वापरावे लागेल. तुमच्याकडे कोणती संसाधने आहेत, तुमचा मुद्दा काय आहे आणि तुम्हाला कोणाला संबोधित करायचे आहे ह्यावर तुमची रणनीती अवलंबून असावी.

**धोरण निर्मात्यांना याचिका, पत्रे लिहिणे-** ह्या याचिका आणि पत्रांमध्ये सहसा काही पुराव्यासह समस्येचे वर्णन असते आणि कृतीचा मार्ग, धोरणातील बदल सुचवतात ज्यामुळे समस्या सोडविण्यात मदत होऊ शकते.

2020 मध्ये, सरकारने पर्यावरण प्रभाव अधिसूचनेच्या मसुद्यावर टिप्पण्या आमंत्रित केल्या होत्या, ज्यात मंजुरी देण्यापूर्वी विकास प्रकल्पांच्या पर्यावरणावरील परिणामाचे मूल्यांकन करणे आवश्यक होते. अधिसूचना फक्त इंग्रजी आणि हिंदीमध्ये उपलब्ध करून देण्यात आली होती आणि टिप्पण्या पाठवण्यासाठी कमी दिवस देण्यात आले होते. फ्रायडेज फॉर फ्युचर सारख्या तरुणांच्या नेतृत्वाखालील काही पर्यावरण गटांनी लाखो तरुणांना एकत्र करून ह्या अधिसूचनेवर चिंता व्यक्त करून आणि बदल सुचविणाऱ्या त्यांच्या टिप्पण्या4 मंत्रालयाकडे पाठवल्या. अखेरीस, सरकारने मुदत वाढवली आणि 22 भाषांमध्ये अधिसूचना प्रकाशित केली!

**समूह तयार करणे-** धोरण निर्मात्यांसोबत काम करण्यासाठी आणि धोरण तयार करण्यात योगदान देण्यासाठी युवक स्वतःचे गट, मंडळ, उपक्रम आणि संस्था सुरू करू शकतात. खालील उपक्रम तरुणांनी सुरू केले आणि त्यांनी धोरणनिर्मितीमध्ये योगदान दिलेले आहेत -हक्कदर्शक, सिविस, समग्र, स्वानिती इनिशिएटिव्ह, माध्यम इनिशिएटिव्ह, सक्रिय नागरिकत्वासाठी युवा नेते (यंग लीडर्स फॉर एक्टिव सिटिजनशिप), झटका इ.

बैठका, परिसंवाद, चर्चा आयोजित करणे – नागरिकांच्या मोठ्या आणि व्यापक गटांमध्ये जागरुकता निर्माण करण्याहेतु, तुमच्या वकिलीच्या प्रयत्नांनी समर्थन गटांचे नेटवर्क तयार करण्यासाठी आणि तुमच्या ध्येयला बळकटी देणारे पुरावे आणि संशोधन तयार करण्यासाठी हे आयोजन केले जाऊ शकतात.

ऑनलाइन स्वाक्षरी मोहीम सुरू करणे – ही वकिलीची एक सामान्यतः वापरली जाणारी पद्धत आहे, जिथे एक याचिका Change.org सारख्या प्लॅटफॉर्मवर सुरू केली जाऊ शकते, ज्यावर धोरणकर्त्यांवर कारवाई करण्यासाठी दबाव निर्माण करण्यासाठी जागरूक नागरिकांकडून स्वाक्षऱ्या गोळा केल्या जाऊ शकतात.

मीडिया आणि सोशल मीडिया मोहिमा तयार करणे– मीडिया आणि सोशल मीडिया मोहिमा, पत्रकार परिषद, वर्तमानपत्रातील लेख, वृत्तवाहिन्यांमधील मुलाखती, सोशल मीडियावर मोहिमा तयार करणे, जे समर्थकांद्वारे सामायिक केले जाऊ शकतात इत्यादी, ह्या सर्व माध्यमांद्वारे धोरणाच्या मुद्द्याबद्दल दृश्यमानता आणि जागरुकता निर्माण केली जाउ शकते आणि धोरण निर्मात्यांना कृती करण्यासाठी समर्थन आणि प्रोत्साहन देण्यात मदद करु शकते.

बदल आणण्यासाठी कला, संस्कृतीचा वापर करणे – अनेक मोहिमा कविता लिहितात, गाणी, पोस्टर्स आणि इतर प्रकारची सर्जनशील सामग्री तयार करतात जेणेकरुन इतर नागरिक आणि धोरणकर्त्यांना त्यांच्या मागण्यांशी जोडतात.

शांततापूर्ण निषेध करणे– हे धोरणाबाबत असंतोष किंवा असहमति व्यक्त करण्यास किंवा बदलाची मागणी करणाऱ्या धोरणाच्या मुद्द्याला हायलाइट करण्यास कायदेशीर स्वरूप म्हणून वापरले जातात. 2011 मध्ये, मोठ्या प्रमाणावर तरुणांनी चालवलेले एक आंदोलन, इंडिया अगेन्स्ट करप्शनच्या बॅनरखाली सरकारी अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांची चौकशी करण्यासाठी लोकपाल नावाची संस्था स्थापन करण्याहेतु मजबूत कायदा बनवण्याची मागणी करण्यात आली. देशव्यापी विरोधानंतर, संसदेने अखेरीस 20135 मध्ये लोकपाल विधेयक मंजूर केले.

**कोर्टात याचिका करणे-** काही वेळी धोरणात बदल घडवून आणण्यासाठी न्यायालयांशी संपर्क साधणे महत्त्वाचे आहे, ज्यामुळे काही धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्वे लागू होऊ शकतात आणि सरकारलाही त्यावर कारवाई करण्यास प्रोत्साहित केले जाते.

**बंगळुरू स्थित एक नागरिक अभियान संस्था- झटका, मोठ्या प्रमाणात तरुणांनी चालवली आहे. ह्यांनी कर्नाटक सरकारला नागरी गतिशीलतेशी संबंधित समस्यांशी निगडित करण्यासाठी कायदा आणण्याची विनंती करणारे निवेदन सुरू केले. त्यांनी अनेक आमदारांची भेट घेतली आणि त्यांच्या निवेदन सादर केले. आमदारांनी सरकारला ह्या दिशेने विधेयक आणण्याची विनंती केली. अखेर बेंगळुरू मेट्रोपॉलिटन लँड ट्रान्सपोर्ट अथॉरिटी विधेयक २०२२६ मध्ये विधानसभेसमोर मांडण्यात आले.**




तुम्ही वकिली करू इच्छित असलेल्या कोणत्याही धोरणात्मक मुद्द्याचा विचार करू शकता का? जर होय, तर तुम्ही कोणती पावले उचलाल आणि तुमची रणनीती काय असेल?

धोरण बदलाची मागणी करणाऱ्या कोणत्याही आंदोलनात तुम्ही कधी सहभागी झाला आहात का? जर होय असल्यास, तर कोणत्या मुद्द्यावर? हे तुम्हाला कसे वाटले आणि निषेधाचा परिणाम काय झाला?

सरकारच्या कोणत्याही धोरणाविरुद्ध शांततापूर्ण आंदोलने करणे हा मूलभूत अधिकार आहे का? जर होय, तर अशा अधिकारावर कोणत्या प्रकारचे निर्बंध होऊ शकती ?

# धोरण निर्माते व्हा

धोरण आणि धोरणनिर्मात्यांसोबत काम करत असताना, वकिली करणे हा व्यवस्थेत बदल घडवून आणण्याचा आणि सहभागी नागरिक बनण्याचा एक शक्तिशाली मार्ग आहे, जो अन्यथा केवळ निवडणूक लढवूनच आणि धोरणकर्ते बनूनच शक्य आहे.

खाणकामामुळे 21 वर्षीय लक्ष्मी भीलच्या समुदायाला भेडसावणाऱ्या आरोग्य आणि उदरनिर्वाहाच्या समस्यांबद्दल चिंतित, तीने सरपंचपदासाठी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आणि ती काबरा ग्राम परिषद, भिलवाडा राजस्थानची सरपंच झाली. ह्या तरुण आदिवासी राजकीय नेत्याला आता इतर तरुणांना पंचायत प्रशासन  चालवण्यासाठी पुढे येण्याची प्रेरणा द्यायची आहे[7].

# कोण  धोरणनिर्माता बनू शकतो?

- 25 वर्षांपेक्षा जास्त वयाची कोणतीही व्यक्ती लोकसभा आणि राज्य विधानसभेसाठी निवडणूक लढवू शकते
- पंचायत आणि नगरपालिकांमध्ये निवडणूक लढवण्याचे किमान वय २१ वर्षे आहे.

2021 मध्ये, केरळमध्ये दोन 21 वर्षीय तरुणींनी इतिहास रचला. २१ वर्षांचा आर्या राजेंद्रन आणि रेश्मा मरियम रॉय हे भारतातील सर्वात तरुण निवडून आलेले महापौर आणि पंचायत अध्यक्ष बनले

नुकत्याच झालेल्या काही राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये तरुणांचा चांगला सहभाग दिसून आला, तर काही राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये तरुणांचा कमी सहभाग दिसून आला. उदाहरणार्थ, 2023 मध्ये झालेल्या नागालँड विधानसभा निवडणुकीत, सर्व उमेदवारांपैकी फक्त 10.32% उमेदवार 40 वर्षांपेक्षा[9] कमी वयाचे होते. परंतु 2022 मध्ये झालेल्या गुजरात निवडणुकीत, सर्व उमेदवारांपैकी जवळपास 34% उमेदवार हे 40 वर्षांपेक्षा[10] कमी वयाचे होते. ह्या आधी झालेल्या, 2022 च्या पंजाब विधानसभा निवडणुकीत, सर्व उमेदवारांपैकी 27% उमेदवार 40 वर्षांपेक्षा कमी वयाचे होते आणि अशा काही उमेदवारांनी ज्येष्ठ राजकीय नेत्यांचा पराभव केला. उदाहरणार्थ, मोबाईल फोन दुरुस्तीच्या दुकानात काम करणाऱ्या ३५ वर्षीय तरुणाने २०२२ च्या निवडणुकीत[11] पंजाबच्या विद्यमान मुख्यमंत्र्यांचा पराभव केला.

# विद्यार्थी राजकारणापासून सुरुवात

- आयुष्याच्या उत्तरार्धात सक्रिय राजकारणी बनलेल्या अनेकांनी विद्यार्थीदशेपासूनच राजकारणात सहभागाला सुरुवात केली.
- शालेय किंवा महाविद्यालयीन विद्यार्थी ह्या नात्याने, काही विद्यार्थी राजकीय गटांमध्ये सामील होऊन राजकारणात सामील होतात, राजकीय कार्यात किंवा आंदोलनात भाग घेतात किंवा निवडणूक लढवतात. ह्यामुळे एखाद्याला चांगल्या ध्येयसाठी राजकारण कसे वापरले जाऊ शकते ह्याचा अनुभव घेण्यास त्याला मदत होते. विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये योग्य सुविधा मिळाव्यात, फीमध्ये कोणतीही अवाजवी वाढ होऊ नये, महाविद्यालय किंवा विद्यापीठ प्रशासन योग्य प्रकारे काम करत असावेत, ह्यासाठी विद्यार्थ्यांचा राजकीय गट महत्वाचा हातखंडा असतो.
- विद्यार्थी राजकारणाद्वारे, राजकारणात रुचि असलेल्या युवकांना राजकीय मोहिमेचे व्यवस्थापन आणि चालवण्याचा अनुभव, धोरणातील बदलांसाठी समर्थन इत्यादींचे ज्ञान व देखील मिळते ज्यामुळे भविष्यात त्यांनी पुन्हा निवडणूक लढवली नसली तरीही त्यांना सक्रिय नागरिक बनण्यास मदत होते.

# तरुणांच्या राजकारणातील सहभागात अडथळे

- बऱ्याचदा तरुण लोक राजकारणाला जोखमीचा व्यवसाय मानतात आणि त्यांच्या सुरक्षिततेची काळजी त्यांना राजकारणात भाग घेण्यापासून दूर ठेवू शकते.
- अनेक तरुण निवडणूक लढवण्यासाठी पुढे येत नाहीत कारण त्यांना निवडणूक लढवण्या करता लागणारी आर्थिक आणि मानवी संसाधने जमवता येत नाहीत.
- त्यांना कदाचित त्यांच्या मित्रांकडून आणि कुटुंबीयांकडून पाठिंबा मिळत नसल्यामुळे त्यांना लढण्यापासून परावृत्त करू शकतात. त्याऐवजी त्यांना अभ्यासावर आणि त्यांच्या करिअरवर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले जाते.
- राजकीय पक्ष तरुणांना विजयी उमेदवार समझत नाहीत आणि त्यांना तिकीट देत नाहीत.

?

ह्यावर विचार करा

अधिक तरुणांनी निवडणूक लढवावी असे तुम्हाला वाटते का? का किंवा का नाही? अधिक तरुण निवडणूक लढवण्याचा विचार कशामुळे करतील?

तुमच्या आजूबाजूच्या कोणत्याही तरुणाने कधी निवडणूक लढवली आहे का? त्याचा परिणाम काय झाला आणि त्यांचा अनुभव कसा होता?

तुम्ही कधी निवडणूक लढवली आहे का ? तुमचा अनुभव कसा होता?

तुम्ही 40 वर्षांचे होण्यापूर्वी कोणतीही निवडणूक लढवू इच्छिता का? का किंवा का नाही?

# शब्दकोष

## मतदारसंघ:

एक क्षेत्र जेथे लोक त्यांच्या प्रतिनिधीला मतदान करतात. सरकारच्या विविध स्तरांसाठी विविध प्रकारचे मतदारसंघ आहेत.

## सार्वजनिक प्राधिकरण:

कोणतीही निकाय, प्राधिकरण किंवा संस्था, जी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सरकारशी संबंधित आहे किंवा त्यांना सरकारद्वारे निधी उपलब्ध आहे.

## प्री-लेजिस्लेटिव्ह कन्सल्टेशन पॉलिसी (पीएलसीपी)-

ही विधेयके संसदेत मांडण्यापूर्वी किंवा सरकारद्वारे अधिसूचित करण्यापूर्वी मसुदा विधेयके किंवा नियमांवर लोकांकडून आणि भागधारकांकडून टीका टिप्पणी मिळविण्याचा प्रयत्न करणेची प्रक्रिया आहे.